# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील. अपील क्र. ९२५/नाग/२०१०, अपील क्र. ९८९/नाग/२०१०

१. श्री खेमचंद घिगुजी मेश्राम - **अपीलकर्ता**
C/o, बन्सी रामटेके, संत गाडगेबाबा नगर, नगिनाबाग, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी (गट-अ) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (समाज कल्याण विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

४. जनमाहिती अधिकारी
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक ०९/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपील क्र. ९२५/नाग/२०१० दि. ३०/०६/२०१० रोजी व अपील क्र. ९८९/नाग/२०१० दि.१२/०७/२०१० रोजी ही दोनही अपीले एकाच माहितीच्या संदर्भातील असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून अपील क्र. ९२५/नाग/२०१० दिनांक ०३/०७/२०१० रोजी व अपील क्र. ९८९/नाग/२०१० दि.२०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. २२/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे संत चोखामेळा बोर्डींग चंद्रपूर अंतर्गत सुरु असलेल्या सर्व वस्तीगृहांची सविस्तर माहिती २००९ ते २०१० या कालावधीतील असून संत चोखामेळा बोर्डींग चंद्रपूर अंतर्गत चार वस्तीगृह सुरु आहेत. चंद्रपूर येथे दोन (एक मुलांचे व एक मुलींचे) वरोरा येथे एक व सिंदेवाही येथे एक असे चार वस्तीगृह असून चंद्रपूर येथील मुलांचे वस्तीगृहात किती विद्यार्थी असणे बंधनकारक आहे. तसेच येथील मुलींच्या वस्तीगृहात किती विद्यार्थीनींना प्रवेश दिला जातो तर वरोरा येथे किती विद्यार्थी असावे असा नियम आहे व सिंदेवाही येथे किती विद्यार्थी दरवर्षी ठेवले जातात. प्रती विद्यार्थ्यांच्यामागे किती अनुदान मिळते, या सर्व विद्यार्थ्यांस कोणत्या सुविधा पुरविल्या जातात. अशी माहिती व तसेच अनेक प्रश्न विचारुन जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे.

**३.	अपील क्र. ९२५/नाग/२०१० -** अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी दि. २०/०५/२०१० रोजी पत्र दिलेले दिसून येते. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. २९/०५/२०१० प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना त्याचवेळेस नियमांची माहिती उपलब्ध करुन दिली व अपीलकर्ता यांना दि. २३/०६/२०१० रोजी माहिती मिळाल्याचे नस्तीवर लिहून दिले तरीसुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना नियमांची प्रत मिळाली परंतू विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली नाही. अपीलकर्ता यांनी कोणत्या सुविधा मिळतात याबाबतची जी माहिती मागितली त्याकरीता त्यांना नियम देण्यात आले आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यांचे जे प्रश्न आहेत त्यातून जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारले आहे जे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षीत नाही तसे असल्यास अपीलकर्ता यांनी नियमांच्या प्रमाणे जी अनियमितता होत आहे त्याप्रमाणे योग्य त्या सक्षम अधिकाऱ्याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. परंतू माहिती उपलब्ध झाल्यामुळे व अपील क्र. ९२५/नाग/२०१० व अपील क्र. ९८९/नाग/२०१० ह्या दोनही अपीलांमधील माहिती ही एकाच स्वरुपाची असल्यामुळे ही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांची दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ९९२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेश हरिश्चंद्र आजबले<br>मु. सुरबोडी पो. नेरला<br>ता. पवनी जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक<br>राज्य परिवहन महामंडळ, भंडारा विभाग<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक<br>राज्य परिवहन महामंडळ, पवनी आगार<br>ता. पवनी जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३०/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी आगार व्यवस्थापक राज्य परिवहन महामंडळ, पवनी आगार जि. भंडारा यांचे कार्यालयात दि. ०१/१२/२००९ व दि. ०३/१२/२००९ रोजीच्या लॉगशिटवर टिप लिहिल्याप्रकरणी जी सक्त ताकीदची शिक्षा दिली आहे त्या संबंधीत लॉगशिटवर तसेच समरी चार्जशिटची नकल बाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. दि. ०१/१२/२००९ व दि. ०३/१२/२००९ रोजीच्या लॉगशिटवर टिप लिहिल्याप्रकरणी जी "सक्त ताकीदची " शिक्षा दिली आहे त्या संबंधीत लॉगशिटवर तसेच समरी चार्जशिटची नकल प्रत पुरविण्यात यावी.

२. राज्य परिवहन महामंडळ च्या लॉगशिटवर फक्त बस बीघाड संबंधीतच शेरा मारायला पाहिजे इतर टीप लिहीता येत नाही अशी तरतुद राज्य परिवहन महामंडळाच्या शिस्त आणि अपीलपध्दतीचा कोणत्या नियमामध्ये जी. आर. मध्ये किंवा कोणत्या वर्षीच्या परिपत्रकामध्ये आहे याची नकल प्रत पुरविण्यात यावी.

अशाप्रकारची माहिती मागितली असून सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. २७/०१/२०१० रोजी छायांकित प्रतींचे पैसे भरुन घेवून जावे व मुद्या क्र. २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २५/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दि.२५/०२/२०१० रोजीच माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला व ती माहिती त्यांनी दि. २६/०२/२०१० रोजी रु. ८/- भरल्यानंतर दि. ०४/०३/२०१० ला संक्षिप्त प्रत उपलब्ध झाल्याची पोच दिलेली आहे. व त्यामुळेच प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ९९३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कैलाशकुमार प्रकाशचंद्र मक्कड<br>अमर भवन, जयस्तंभ चौक जवळ, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया - ४४१६०१ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भूमी अभिलेख कार्यालय गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर असून निवेदन दिले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक भूमि अभिलेख गोंदिया यांचे कार्यालयामध्ये नकाशा दुरुस्ती संबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

दि. २७/०७/२००९ को दाखिल प्रकरण जो कि नागरा -२४ गट क्र. ४५५ वहीवाट अनुसार नक्शा दुरुस्ती संबंधीत है |

दि. २७/०७/२००९ से २१/०५/२०१० तक १० महिनो से प्रलंबित नक्शा दुरुस्ती प्रकरण पुर्ण न होने मे आयी अडचनो का संपूर्ण विवरण दिया जाये | प्रकरण पुर्ण करने के अधिकार भूमि अभिलेख को है | या नही अगर है तो संबंधीत जी आर की कॉपी दी जाय, अगर GR नही है तो अधिकार किसे है | उस GR कॉपी दी जाये | किसी उच्च अधिकारी को अधिकार है उस अधिकारी जो की, आज अर्ज दि. २१/०५/२०१० को कार्यरत है | उसका नाम कार्यालय का पत्ता व फोन नं. का संपूर्ण विवरण दिया जाये |

अधिक्षक भूमि अभिलेख से संबंधित सभी प्रकार के प्रकरण पूर्ण करने की कालावधी का G.R. भी प्रदान किया जाये | जैसे कि किसी कार्य को पूर्ण करने मे कानूनन सभी दस्तऐवज उपलब्ध होने पर कितना समय लगता है | उसका GR दिया जाये | अधिक्षक भूमि अभिलेख के अधिकारों का भी GR दिया जाये |

अशाप्रकारची माहिती मागितली असून सदर माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०४/०६/२०१० रोजी दोन मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १९/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २८/०६/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती पुरविण्यात आलेली असल्याने दि. १९/०६/२०१० चा अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. पंरतू त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती अपूर्ण आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, भूमि अभिलेख कार्यालयामध्ये प्रत्येक प्रकरणात कार्यवाही करण्याकरीता किती मुदत असते याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कोणत्या प्रकरणात किती दिवसात कार्यवाही करण्यात यावी असा शासन निर्णय त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. इतर सर्व परिपत्रके त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. वास्तविक दुरुस्ती प्रकरणे ही सर्व्हे प्रकरणाच्या बाबत वगैरे अभिलेख व भूमि अभिलेख यांचेच कार्यालयात होत असल्याने व अपीलकर्ता यांचा व्यवसाय मुळातच जमिनीचा

असल्याने त्यांना या सर्व पध्दतीची माहिती आहे परंतू तरीही अधिकाऱ्यांना त्रास व दबाव आणण्याच्या उद्येशाने ते अशाप्रकारची माहिती मागत असतात. आतापर्यंत त्यांना त्यांच्या व्यवसायासाठी अनेक प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. ते कोणत्याही सार्वजनिक हिताच्या दृष्टीने माहिती मागत नाहीत. तर व्यक्तीगत हिताच्या दृष्टीने माहिती मागत आहेत. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुध्दा या प्रकरणाच्या कार्यवाहीच्या पध्दती करीताच तक्रार स्वरुपात युक्तिवाद केला आहे. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध होवू शकतात. कोणत्याही प्रकरणात चौकशी होवून कार्यवाही करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ९३०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री . विनोद महादेवराव मोहोड<br>सिव्हिल वार्ड साकोली<br>ता. साकोली जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय अर्जुनी / मोर<br>ता. अर्जुनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय अर्जुनी/मोर<br>ता. अर्जुनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०५/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे दि.०२/०८/२०१० च्या सुनावणीस हजर आहेत व उत्तरवादी हे उशीरा हजर झाल्यामुळे या प्रकरणी त्यांना सुनावणीचा पुढील दिनांक १६/०८/२०१० देण्यात आला. त्याप्रमाणे दिनांक १६/०८/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०३/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तहसिलदार यांचे कार्यालयामध्ये १) मौजा सिरोली (महागाव) ता. अर्जुनी/ मोर येथील रघुनाथ खोब्रागडे यांचे मालकीचे शेतजमिनीचे सातबारा नकाशा विस्तारपत्रक व नमुना ८ मिळणेबाबत तसेच २) मौजा सिरोली (महागाव) ता. अर्जुनी /मोर येथील दिलीप रघुनाथ खोब्रागडे यांचे मालकीचे शेतजमिनीचे सातबारा नकाशा विस्तारपत्रक व नमुना ८ मिळणेबाबत माहिती मागितलेली असून ही माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२२/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०८/०७/२०१० रोजी दिला आहे असे नमूद केले आहे परंतू प्रत जोडलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना पाहीजे असलेली माहिती ही तलाठी स्तरावरची माहिती असल्यामुळे दि. २२/०४/२००९ रोजी तलाठी यांना पत्र दिले. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा अपीलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्यास तलाठी यांना सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी तलाठी माहुरकुडा यांच्याकडून अपीलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन अपीलार्थीस दि. ०५/०८/२०१० रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेली आहे. परंतू याबाबतची कोणतीही कागदपत्रे जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे दाखल केलेली नाहीत. तलाठी यांनी दिनांक २२/०६/२०१० रोजी पत्र पाठविल्याची प्रत दाखल केली नाही. नंतर दि.०८/०७/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला त्याची प्रत दाखल केली नाही. दि. ०५/०८/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली त्याबाबतच्या पत्राची प्रत सुध्दा दाखल केलेली नाही मात्र पोस्टाची पावती दाखल केली आहे. परंतू ती कोणत्या संदर्भात आहे या बाबतचा उल्लेख नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. ३१/०३/२००९ च्या अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. ३१/०३/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही जनमाहिती अधिकारी किंवा तलाठी यांनी विहीत मुदतीत केलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये प्रत्येकी रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली ही जिल्हाधिकारी यांनी करावयाची असुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्याने त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही ही जिल्हाधिकारी गोंदिया यांनी करावी त्याकरीता जिल्हाधिकारी गोंदिया यांना सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वंतत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ९३३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री . हरीश सुधाकर रेहेकवार<br>किल्ला वार्ड, जुनी वस्ती तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया - ४४१९११ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम लिपीक<br>नगर परिषद तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०५/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १९/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नगर परिषद तिरोडा जि. गोंदिया यांचेकडे मालमत्ता क्र. ३८९९ श्री सुधाकर बापुदास रेहेकवार, मालमत्ता क्र. ३८८९ श्रीमती पुनाबाई दवलत रेहेकवार, मालमत्ता क्र. ३९०२ विनोद बिसन मुळे, श्रीमती सविता प्रल्हाद मुळे, मालमत्ता क्र. ३८९६ श्रीमती बारजाबाई बे. मोतीराम मंदुरकर यांनी केलेल्या बांधकामाविषयी तसेच जुने बांधकाम वैध की, अवैध आहेत.

अवैध असणाऱ्या बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली, अवैध बांधकामावर कारवाईचा कालावधी काय आहे? अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांना दि. ०८/०१/२०१० रोजी श्री बिसन मुळे किल्ला वार्ड तिरोडा यांनी केलेल्या घरकुलाचे बांधकाम रस्त्यावर येत असून भव्यिात येण्या जाण्यास इतरांना अडथळा निर्माण होईल असे पत्राद्वारे कळविलेले दिसते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. ०८/०२/२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये ५०/- चा भरणा करण्यात यावा असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रु. ५०/- चा भरणा केलेला दिसून येतो. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.१२/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. २०/०४/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी दाखल दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना फक्त दोनच पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. त्याकरीता त्यांचेकडून रु. ५०/- घेतले आहे. अपीलकर्ता यांनी माहिती ही नोंदणीकृत टपालाने घेणार असे कळविले असल्याने त्यांचेकडून टपालाचा खर्च रु. ३० अधिक माहितीचा खर्च रु. ४/- (२+२) म्हणजेच एकूण रु. ३४/- होतात त्यामुळे अपीलकर्ता यांना रु. १६/- हे अतिरिक्त घेतल्यामुळे परत करणे संयुक्तिक राहील. जुन्या बांधकामावर पुन्हा बांधकाम करावयाचे असल्याने परवानगी लागते त्यामुळे जुन्या बांधकामाचे कागदपत्रे उपलब्ध नसतील तर त्यासोबत जर नवीन बांधकाम होत असेल तर त्याची परवानगी घेतली नसेल तेव्हा ते अवैध आहे अशी नोटीस देता येते त्याप्रमाणे तशी नोटीस दिलेली आहे व त्याप्रमाणेच उपलब्ध करुन दिलेली माहिती ही सुध्दा योग्य आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. मात्र रु. १६/- हे परत करण्याच्या संदर्भात अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना २० दिवसांचे आत रु. १६/- हे परत करण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून सदरचा आदेश दाखवून रु.१६/- हे परत करुन त्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर घ्यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ९४०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शंकर लक्ष्मण आंबोरकर<br>संत गाडगेबाबा वार्ड, वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर - ४४२९०७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ०३/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा यांचे कार्यालयामध्ये श्री धोंडू तानू आंबोरकर यांच्या मकानाला पंधरा वर्षापासून कर बाकी थकीत असुन दरवर्षाला जप्तीची नोटीस लावण्यात येते परंतू पुढील कार्यवाही करण्यात का येत नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही, तसेच जर आपणास आवश्यक असलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध असलेले दस्तऐवज पाहून आपण ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. २२/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. विभागप्रमुख कर वसुली विभाग न. प. वरोरा यांनी दि. २३/०४/२०१० रोजी नगर परिषद रेकॉर्ड नुसार कॉलरी प्रभागाचे मालमत्ता अभिलेखा प्रमाणे मालमत्ता क्रमांक २५९ वर श्री धोंडू तानु आंबुरकर यांचे नावाने घर स्लॅबचे कौलारु न. प. लिज म्हणून नोंद असुन सदर मालमत्तेच्या थकीत करासंबंधी नगर परिषदेद्वारे मालमत्ता जप्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही व त्या संबंधी कार्यालयीन दस्तऐवज उपलब्ध नाही अशी माहिती दि. १७/०५/२०१० च्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे कळविण्यात आलेली दिसून येते. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सदरच्या घरावर श्री धोंडु तानु आंबोरकर हे मय्यत असुन सुध्दा व कोणत्याही वारसाचे संमती पत्र नसतांना सुध्दा श्री बाळा धोंडु आंबोरकर यांना नगर परिषदेने संडास योजनेचा लाभ दिला होता. तसेच कर थकबाकी असुन सुध्दा जप्ती करण्यात आलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तसेच मुख्याधिकारी नगर परिषद यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची कागदपत्रे आता उपलब्ध नाही. तसेच त्यांचे ३ ते ४ वर्षाचे मालमत्ता कर थकीत असल्यामुळे अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही तसे असल्यास अपीलकर्ता यांना लेखी कळविणे संयुक्तिक राहील.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ९४२/नाग/२०१०**

१. श्री नारायण पांडुरंग गुरवे - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. ११, गीतानगर टाकळी पो. मानकापूर, नागपूर
ता. जि. नागपूर ४४००३०

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष - **उत्तरवादी**
जूपीटर आयुर्वेदीक महाविद्यालय, नागपूर
सावरकर नगर, खामला रोड, नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जूपीटर आयुर्वेदीक महाविद्यालय, नागपूर
सावरकर नगर, खामला रोड, नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १०/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष माहिती अधिकारी जूपीटर आयुर्वेदीक महाविद्यालय, सावरकर नगर नागपूर यांचेकडे टियुशन फी म्हणून १ लाख रुपयामधून रु.२०,०००/- ची कपात केल्यामुळे केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी हा २२/०८/२००६ ते ३१/०५/२००७ असून माहिती शिघ्र व साध्या टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. ३१/०५/२००७ रोजी शिक्षा शुल्क समितीने माहितीचा अधिकार पत्राची प्रत पाठविली आहे परंतु ती अद्यापपर्यंत मिळाली नाही तसेच दि. ०५/०५/२००७ चे पत्राची पोच उपलब्ध झाली नाही असे नमूद केले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २४/०१/२०१० रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशीक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू ते प्रथम अपीलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी संबंधीत महाविद्यालयातील अपील तक्रार असल्यामुळे प्रथम अपील करावे असे कळविले त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केले. मात्र संस्थेचे अध्यक्ष यांचेकडे तक्रार अर्ज पुन्हा दाखल केलेला दिसून येतो. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना रु. २०,०००/- कसे कापण्यात आले व अंतिम तारीख काय होती याबाबत आयोगापुढे सांगितले. परंतू अपीलकर्ता यांनी दि. ०५/०५/२००७ रोजी ज्युपीटर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज शंकरपूर नागपूर यांनी नियम सुध्दा कळविलेले आहे. त्यामुळे पुन्हा त्या संदर्भात माहिती मागण्यापेक्षा विद्यापीठाकडे तक्रार करणे संयुक्तिक झाले असते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ९३९/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिवाकर रामभाऊ कोरेवार<br>मु. कोटगल पो. पारडी<br>ता.जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक (मुख्यालय व नियोजन)<br>दक्षिण गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली<br>पोटेगाव रोड, गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>वनसंरक्षक कार्यालय दक्षिण चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर<br>मुल रोड, ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अवये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता दि. ०५/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी वनसंरक्षक दक्षिण वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रामणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-१ (३) आस्था / द/७९३२ चंद्रपूर दिनांक १६/०२/२०१० चे पत्रामध्ये नमूद केल्यानुसार बिंदु नामावली नुसार दि. ३१/१२/२००० रोजी आरक्षण टक्केवारीनुसार भ.ज. क. प्रवर्गात चार पदे येतात. त्यापैकी तीन पदे भरलेली असून १ पद रिक्त होते असे दर्शविलेले आहे. करिता सदर ३ पदे कोणत्या वनसंरक्षकांना पदोन्नती देवून भरण्यात आले. त्यांची नावे, दिनांक व कोणत्या D.P.C. नुसार भरण्यात आले. त्याचे कार्यवृत्ता बाबतचे झेरॉक्स प्रत मिळणेबाबत.

अशी माहिती मागितलेली असून सदर माहितीचा कालावधी हा दि. ०१/०१/२००० ते ०१/०४/२०१० असा असून ही माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १२/०४/२०१० रोजी अपीलकर्ता यांना कक्ष प्रमुख आस्थापना कक्ष निर्देशन विभाग दक्षिण चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २७/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२५/०५/२०१० रोजी देण्यात आला असून पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, दि. ३१/१२/२००० रोजी जी ३ पदे भरण्यात आली होती त्या तीन पदावंर कोणाला नियुक्ती देण्यात आली याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यानंतर D.P.C. ची बैठक झाली D.P.C. च्या बैठकीमध्ये एक रिक्त पद व अजून दोन पदे भरण्यात आली त्यानंतर पुन्हा २००२ मध्ये D.P.C. ची बैठक होवून पदे भरण्यात आली. अपीलकर्ता यांना पदोन्नती मिळाली

आहे असे असले तरी दि. ३१/१२/२००० रोजी आरक्षण टक्केवारीनुसार तीन पदांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत दि. ३१/१२/२००० रोजी तीन पदावर कोण कार्यरत होते त्याची माहिती अपीलकर्ता यांना देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ९५३/नाग/२०१०**

१. श्री प्रविण पुंडलिकराव राऊत - **अपीलकर्ता**
३६५, सहयोग नगर, नारी रोड पो. उप्पलवाडी, नागपूर
ता.जि. नागपूर - ४४००२६

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा.

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा कृषी अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक ०३/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी जिल्हा परषिद वर्धा यांचेकडे कृषी अधिकारी पंचायत समिती सेलू (आर्वी) येथून जप्त केलेल्या रेकॉर्ड संबंधातील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१)	दि. २९/०३/२००८ चे आपल्या कार्यालयामधून श्री पी.पी. राऊत यांना लिहिलेल्या पत्रानुसार. १) श्री वि.म. मरसकोल्हे रा. हरदोली., २) रामाजी हरबाजी मेश्राम रा. पिंपळखुटा, ३) विघ्नेश्वर करवाडे रा. निजामपूर, ४) विलास उपाध्ये रा. निजामपूर. (ब)

अ)	या लाभार्थ्यांच्या मूळ दस्तऐवजाच्या नस्ती गायब आहेत ह्या बाबत कोणत्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली त्या अधिकाऱ्यांची नावे व पत्ता.

ब)	ह्या नस्ती दि. २६/०२/२००८ ते २९/०३/२००८ पर्यंत ज्या अधिकाऱ्याने जप्त केले व नस्तीची हाताळणी केली त्या कालावधीतील अधिकाऱ्यांचे नांव व पत्ता

क)	ह्या बाबत पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदविलेली आहे किंवा नाही याबाबतची संपूर्ण माहिती.

ड)	ह्या बाबतचा अनुसुचित जाती / जमाती आयोग मुंबई ह्यांना दि. २३/०९/२००८ ला पाठविलेले पत्राची झेरॉक्स प्रत.

अशी माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३.	अर्जाच्या अनुषंगाने दि. ०९/०४/२०१० रोजी मुद्या क्र. अ, ब, क मधील माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. व मुद्या क्र. ड मध्ये अनुसुचित जाती / जमाती आयोगाकडून प्राप्त पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे असे कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. ०७/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलचा निर्णय दि. ०१/०६/२०१० रोजी देण्यात आलेला असून श्री मरघडे जिल्हा कृषी अधिकारी सामान्य व श्री ऐटीवार कक्ष अधिकारी यांनी पंचायत समिती आर्वी या कार्यालय स्तरावर चौकशी करुन त्यांचा अहवाल तयार करुन प्रत्यक्ष परिस्थिती नुसार नियमाप्रमाणे श्री पी. पी. राऊत यांना १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि. १४/०६/२०१० रोजी मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसून ती पंचायत समिती आर्वी या कार्यालयाची आहे. तेव्हा सदर माहिती प्राप्त होताच आपणास देण्यात येईल. किंवा आपणच परस्पर माहिती पंचायत समिती आर्वी या कार्यालयाकडून प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सदरच्या नस्त्या त्यांचेकडून जप्त करण्यात आल्या होत्या. व  नंतर मात्र त्या मिळून येत नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेविरुध्द आरोप केले आहेत म्हणूनच अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्त्या मागितल्या आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्याकडून ज्या नस्त्या घेतल्या होत्या त्या त्यांना परत करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्या कार्यालयात उपलब्ध नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. व कारणे दाखवा नोटीसेस पण काढण्यात आले आहेत. परंतू अद्यापपर्यंत त्याबाबतची चौकशी पूर्ण झालेली नाही.

वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी करतांनाच त्यांचेच अधिकार कक्षेतील अधिकारी व माहिती असल्यामुळे त्याच वेळेस माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते परंतू कोणतेही प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीची फक्त शिफारस करतात किंवा सुनावणी घेतही नाहीत व माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश करतात. व त्यामुळे आयोगाकडे अपील  दाखल होतात. या प्रकरणात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी यांना सर्व कागदपत्रे घेवून बोलवावे व त्यातून त्याच वेळेस माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा तसेच त्यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी सुरु असल्यास ती पूर्ण करुन त्याबद्यलची माहिती सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

## आ दे श

१.	प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रथम अपीलाची सुनावणी घ्यावी व वरील विवेचना प्रमाणे कार्यवाही करावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ९५५/नाग/२०१०**

१. श्री घनश्याम ऊर्फ बाळा वामनराव परणकर - **अपीलकर्ता**
रा. गणपती वार्ड, आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा-४४२२०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार आर्वी - **उत्तरवादी**
ता. आर्वी
जि. वर्धा.

**अपील क्र. ९५६/नाग/२०१०**

४. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी कार्यालय, आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक ०३/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी बैठक असल्यामुळे पुढील तारीख मागितली आहे.

अन्यथा नायब तहसिलदार श्री ए. एम. धरमपुरियाँ यांना सदर प्रकरणी प्राधिकृत केले असून ते उपस्थित आहेत.

२. **अपीलकर्ता यांचे अपील क्र. ९५५/नाग/२०१० -** जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजस्व आर्वी जिल्हा वर्धा यांचेकडे दि. ०९/०४/२०१० रोजी आर्वी पुलगाव रस्त्यावरील पिपरी पारगोठाण ते धनोडी पर्यंत वळण रस्त्याचे काम सुरु आहे या रस्त्याच्या बाजूला अवैध उत्खनन चालू असतांना उपविभागीय अधिकारी धार्मीक साहेब व तहसिलदार झिरवाळ साहेब यांनी अवैध उत्खनन करीत असतांना त्या जागेवर वाहणे पकडली. अवैध उत्खनन करीत असतांना केलेल्या पंचनाम्याचा पूर्ण तपशिल (अहवाल) देण्यात यावा व त्यांच्यावर कोणत्या प्रकारची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली त्याचा पूर्ण तपशील (अहवाल) द्यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते. आठ दिवसांचे आत माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. २२/०४/२०१० रोजी मागितलेल्या माहितीचा शोध घेणे चालू आहे, माहिती मिळताच आपणास पत्राद्वारे कळविण्यात येईल असे नायब तहसिलदार आर्वी यांनी कळविले आहे. त्यानंतर दि.१२/०५/२०१० रोजी अर्ज हा दि. ३०/०४/२०१० रोजी प्राप्त झाल्यामुळे अर्जातील मुद्या क्र. ३ ते ५ अन्वये माहिती या सोबत जोडण्यात आलेली आहे माहिती अपूर्ण म्हणून श्री चौधरी यांनी सही केली. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २६/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २२/०६/२०१० रोजी देण्यात आला असून अवैध उत्खनन करणाऱ्यावर कोणत्या प्रकारची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती विना शुल्क देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. तरीसुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचेतर्फे श्री चौधरी यांनी मुद्या क्र. १ ची माहिती स्विकारलेली आहे मात्र मुद्या क्र. २ च्या संदर्भात अद्यापपर्यंत दंडात्मक कार्यवाही झालेली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी जो अर्ज उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केला होता तो दि. २२/०४/२०१० रोजी हस्तांतर करण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती ही नायब तहसिलदार यांचेकडून उपलब्ध

करुन देण्यात आलेली आहे असे सांगितल्यावर अपीलकर्ता यांनी पंचनाम्याची माहिती मिळाली हे मान्य केले. दंडात्मक कार्यवाही केली नाही तरीसुध्दा ती माहिती होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही तर अर्ज करतेवेळी जशी माहिती आहे तशीच उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधीत कंपनीच्या विरुध्द दोनवेळा कारणे दाखवा नोटीस काढले व सुनावणी ठेवण्यात आली होती परंतू ते हजर झाले नाहीत. तिसऱ्या वेळेस नोटीस काढून हजर न राहिल्यास त्यांचेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल त्यामुळे ती कार्यवाही झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**५. अपील क्र. ९५६/नाग/२०१० -** दिनांक १६/०४/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (राजस्व) आर्वी वर्धा यांचे कार्यालयात वाढवे दयाराम गंगाराम यांचे मालकिची खाजगी जमीन त. सा. क्र. १६ सर्व्हे तं. ११२ मौजा पारगोठाण हे. आराजी २.२२ या जमिनीला ब्लास्टिंग करुन गोटा नेण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात यवतमाळ येथील ओबेरॉय कंस्ट्रक्शन कंपनी यांना दि. ०६/०४/२०१० पासून दि. ३०/०४/२०१० पर्यंत गोटा देण्यासाठी रॉयल्टी देण्यात आली आहे. रॉयल्टीच्या संदर्भातील उत्खननाच्या परवानगी संदर्भात अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली आहे असे दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

६. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०३/०५/२०१० च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्चासाठी रु. १४/- भरुन माहिती घेवून जावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे दि. २५/०५/२०१० रोजी श्री प्रदीप चौधरी यांनी अपीलकर्ता यांचे तर्फे ७ प्रतीत माहिती घेतली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २२/०६/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

उत्तरवादी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी माहिती त्यांना दिलेली आहे, त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१. अपील क्र. ९५५/नाग/२०१० व अपील क्र. ९५६/नाग/२०१० ही दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ९५७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास दशरथजी दहाट<br>C/o, जी. ए. बन्सोड, ६५ विवेकानंदनगर, साई मंदीर मागे,<br>वर्धा रोड, नागपूर -१५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा अर्ज हा शिक्षणाधिकारी यांचेकडे हस्तांतर केला आहे. त्यामुळे सुनावणीचे वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर हे उपस्थित आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. २०/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१)	माझे निवेदन अर्ज दि. ०४/०६/२००७, १२/११/२००८.

२)	मा. विभागीय आयुक्त नागपूर यांचा आदेश क्र. विशा/कार्या ११ (५) /कावि/९१२/२००८ दि. २९/११/२००८.

३)	मा. अध्यक्ष राष्ट्रीय अनु. जाती आयोग पुणे यांचे आदेश क्र. NCSC/PUNE/१३/२०१० SSW परवाना इ.) IV/१०३ दि. ०६/०५/२०१० यानुसार केलेल्या कार्यवाहीची तसेच शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. नागपूर यांच्या स्पष्टीकरणाची प्रमाणित प्रत देवून माहिती द्यावी.

वरीलप्रमाणे माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केले आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कक्ष अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही व ती जनमाहिती अधिकारी शिक्षण विभाग (माध्यमिक) यांचेकडे उपलब्ध आहे या कारणास्तव दि.२६/०५/२०१० ला शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज हस्तांतर करण्यात आला. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.१०/०६/२०१० रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे संबंधीत विषयाकरिता प्रथम अपीलीय अधिकारी नसून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे असल्यामुळे दि. ११/०६/२०१० च्या पत्रान्वये त्यांचेकडे प्रथम अपील हस्तांतरीत करण्यात आले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही.

३.	विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांना याबाबत काही माहिती आहे असेही दिसून आले नाही. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद नागपूर हे उपस्थित असून त्यांनी शिक्षण विभागाकडे अर्ज हस्तांतर केला. परंतू द्वितीय अपील मेमोमध्ये हस्तांतर माहिती आयोगाचा उल्लेख नसल्यामुळे त्यांना आयोगाकडून नोटीस काढण्यात आले नाही व ते आज हजर नाही त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपीलकर्ता यांना त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन द्यावी त्यासाठी प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता हे प्रकरण प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे हस्तांतर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना त्याच दिवशी माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ९६१/नाग/२०१० - अपील क्र. ९६२/नाग/२०१०</u>**

१. श्री प्रकाश दगडू भांरबे - **अपीलकर्ता**
C/o, किशोर मुंजनकर, ७-ए, साटोने ले- आऊट, गिताई नगर
धुनिवाले मठासमोर, नागपूर रोड, वर्धा ता.जि. वर्धा-४४२४०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उ पसचिव - **उत्तरवादी**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई -४०० ००१

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव - **उत्तरवादी**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट मुंबई - ४०० ००१

**(आदेश पारित दिनांक ०४/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपील क्र. ९६१/नाग/२०१० व अपील क्र. ९६२/नाग/२०१० ही दोनही अपीले अपीलकर्ता यांनी दि.०५/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदर दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता हे हजर असून सविस्तर निवेदन दिले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ९६१/नाग/२०१० व ९६२/नाग/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी तथा उपसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचे कार्यालयामध्ये इंटरनेटवर दि. २१/११/२००८ ला महाव्यवस्थापक उपदुग्धशाळा व्यवस्थापक इ., दुग्धव्यवसाय विकास विभाग, सामान्य राज्य सेवा गट - अ (कनिष्ठ) पदावर नियुक्तीकरीता जाहीर केलेल्या शिफारसीतील उ मेदवारांचे त्यांनी त्यांच्या उ मेदवारी अर्जात नमूद केल्या प्रमाणे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणित प्रती व गट-ब तांत्रिक पदाला समतुल्य पदावरील अनुभवाच्या प्रमाणित प्रती. अशी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत प्रभाकरराव मोहोड. | २. | श्री. मनोहर जगन्नाथ गजभिये. |
| ३. | श्री. अभय जनार्दन मुळे. | ४. | श्री. हेमंत गुलाबराव पडवे. |
| ५. | श्री. रणजितकुमार लालसिंग राठोड. | ६. | श्री. नथु विठ्ठल राठोड. |

या सर्वानी त्यांच्या पदाच्या उ मेदवारी अर्जात नमुद केलेली **१.** त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणित प्रती. **२.** गट-ब तांत्रिक पदाला समतुल्य पदावरील अनुभवाच्या प्रमाणित प्रती. अशी माहिती मागितलेली असुन सदर माहिती स्पीड पास्टाने घेणार असे नमूद केले आहे.

**३. अपील क्र. ९६१/नाग/२०१० -** अर्जाच्या अनुषंगाने दि. ११/१२/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांनी कळविले की, महाव्यवस्थापक, दुग्धशाळा व्यवस्थापक इ. दुग्धव्यवसाय विकास विभाग सा.रा.से., गट-अ (कनिष्ठ) या पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवाराविषयीची खाजगी व गोपनीय स्वरुपाच्या माहितीची मागणी संदर्भात आपले लक्ष केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम ८ (१) (d), ८ (१) (e) व ८ (१) (j) कडे वेधण्यात येत आहे. तसेच कोणताही स्पर्धक उ मेदवार जेव्हा आयोगाकडे आपला अर्ज सादर करतो त्यावेळेस सदर माहिती ही त्या उ मेदवाराने आयोगाला सादर केली असून, सार्वजनिकरित्या प्रसिध्द करण्यासाठी दिलेली नसते. जी माहिती उ मेदवार आवेदनपत्रात नमूद करतात त्याची पडताळणी करुन प्रचलित सेवाप्रवेश नियम व त्यातील तरतूदींच्या आधारे आयोग योग्य व पात्र उमेदवारांची शासनाकडे शिफारस करते. अशा रितीने आयोग व स्पर्धक उमेदवार यांच्यामध्ये विश्वासाश्रित नाते निर्माण होते.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमातील उपरोक्त कलमातील तरतुद, मा. केंद्रिय तसेच राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशांचे अवलोकन केले असता आपल्या लक्षात येईल की आपण मागितलेली त्रयस्थ व्यक्तींविषयीची खाजगी व गोपनीय स्वरुपाची माहिती पुरविणे आयोगास शक्य नाही त्या निर्णयाची माहिती दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०९/०१/२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२८/०६/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपील अमान्य करण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी ज्या कारणास्तव माहिती नाकारलेली आहे ती कारणे योग्य नाही. अधिनियमाचे कलम ८ (१) मधील (ग) (घ) मधील त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धामधील स्थानाला हानी पोहचेल या कारणास्तव माहिती नाकारलेली आहे. परंतू शासकीय सेवेत घेण्यासाठी मुलाखात घेतांना त्यामध्ये प्रत्येक स्पर्धकास विशिष्ट अटी पूर्ण कराव्या लागतात व त्या अटी जाहिरातीत दिल्या असतात. त्या अटी पूर्ण केल्या किंवा नाही या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याबाबत त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धांमधील स्थानाला कोणतीही हानी पोहचत नाही. व ती त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही, सार्वजनिक अभिलेखे होतात. आणि ज्या स्पर्धकांतर्फे जी कागदपत्रे दाखल केली जातात ती कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखे होतात, त्या आधारावरच निवड होते व त्यामधे त्या अटी पूर्ण केल्या किंवा नाही त्याबाबतची माहिती ही सार्वजनिक सेवकाची नियुक्ती असल्याने सार्वजनिक हितामध्ये येते. पोट कलम ८ (१) (ङ) मधील विश्वाश्रीत संबंधामुळे माहिती प्रकट करता येत नाही या कारणास्तव नाकारलेली आहे. परंतू स्पर्धक व आयोग या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचे नाते नाही. आयोगातील जाहिरातींमध्ये आवश्यक अर्हतेप्रमाणे कागदपत्रे दाखल करण्याची अट दिलेली असते व त्या प्रमाणे कागदपत्रे दाखल करावी लागतात. ज्याअर्थी जाहिरातींमध्ये अर्हता दिलेली असते त्याअर्थी जी कागदपत्रे अर्हतेनुसार दाखल केली जातात किंवा नाही हे तपासणे आवश्यक असते व ती वैयक्तिक माहितीमध्ये मोडत असली तरी तो सार्वजनिक अभिलेखाचा भाग होतो. व सार्वजनिक हिताच्या दृष्टिने शासकीय सेवांमध्ये जी नियुक्ती दिली जाते त्यावेळी नियुक्ती केलेली व्यक्ती ही सार्वजनिक सेवक होते. व सार्वजनिक सेवक झाल्यावर त्या व्यक्ती सार्वजनिक हिताचेच काम करतात.

त्यामुळे त्या व्यक्तींची नियुक्ती ही सार्वजनिक विभागाचे हितामध्येच समाविष्ट होते, त्या व्यक्तीच्या नियुक्ती अर्हतेच्या संबंधातील कागदपत्रे ही सार्वजनिक हिताच्या दृष्टिने अटीची पूर्तता करण्याचे असले पाहिजे व त्यामुळे त्यांनी ज्या प्रमाणे कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे ती प्रमाणपत्र जाहिरातीतील अटीं प्रमाणे असली पाहिजे, त्यामुळेच जी माहिती प्रकट करणे हे व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टिने आवश्यक आहे, त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती नाकारलेली आहे ती अन्यायकारक व अयोग्य आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्णयाप्रमाणे सदरची माहिती ही गोपनीय आहे व त्यामुळे ती माहिती अर्जदाराला दिलेली नाही. परंतू केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय हा राज्य माहिती आयोगास बंधनकारक नाही. तसेच राज्य माहिती आयोगाचा एका मुद्यांवरील निर्णय सुध्दा निदर्शनास आला आहे. त्यावर पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे फक्त कागदपत्रेच अथवा प्रमाणपत्रेच दाखल करुन घेतात व ती कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे जाहिरातीतील अटींप्रमाणे आहेत किंवा नाही हे तपासून घेतात. पंरतू ती प्रमाणपत्रे ही खरी आहेत किंवा खोटी आहेत हे तपासण्याचा अधिकार हा आयोगास नाही व त्यामुळे लोकसेवा आयोग शासनाकडे नियुक्तीची शिफारस करतांना प्रमाणपत्रांची योग्य प्रकारे शहानिशा करावी व त्यानंतरच नियुक्ती द्यावी अशाप्रकारची शिफारस करीत असते. निवड झाल्यावर ज्यांची शिफारस करण्यात आली आहे त्यांच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे ही शासनाकडे पाठविली जातात. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी ज्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे त्या सहा व्यक्तींची निवड करुन शासनाकडे शिफारस केलेली असून त्यांची सर्व कागदपत्रे ही शासनाकडे पाठविण्यात आलेली आहेत.

५. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचा पत्ता बदलेला असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय त्यावेळेस देता आलेला नाही. राज्य माहिती आयोगाचे आदेशाप्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली असून दि. २८/०६/२०१० रोजी शिफारसीस पात्र ठरलेल्या उ मेदवारांच्या शिफारसी शासनास दि. २८/१२/२००८ ला केल्या असून त्या उ मेदवारांचे मूळ अर्ज व त्यासोबतची सर्व प्रमाणपत्रे शासनास पाठविली असल्याने ती माहिती आयोगाकडे उ पलब्ध नाही. त्यामुळे अपीलकारास उमेदवारांच्या प्रमाणपत्रांच्या प्रतींसंदर्भात शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई विभागाशी संपर्क साधावा, असे

त्यांना  सांगण्यात आले. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात सांगण्यात आले परंतू त्यावर अपीलकर्ता यांनी हरकत घेतली व असे सांगितले की, त्यांना हे केव्हाही सांगितलेले नाही. परंतू अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर होते व तत्पूर्वी त्यांना केव्हाही सांगण्यात आलेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू आज अशी वस्तुस्थिती आहे की, लोकसेवा आयोगाने दि. २८/१२/२००८ ला नियुक्तीची  शिफारस  केलेली असल्याने व सर्व कागदपत्रे ही शासनाकडे पाठविण्यात आलेली असल्याने सदरची माहिती ही शासनाकडून  उ पलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६.  **अपील क्र. ९६२/नाग/२०१० -** अपीलकर्ता यांनी दि. २७/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी उ पसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

आयोगाच्या दि. २३/०२/२००८ चे मुलखत पत्र क्र. ९१४ (५७) /६६७/एसडी / आट ब दि. २७/०२/२००८ चे मुलाखात पत्र क्र. ९१४ (५४)/ ६६६/ एस डी ८ नुसार अनुक्रमे महाराष्ट्र शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागातील महाव्यवस्थापक,  उपदुग्धशाळा व्यवस्थापक इ. (सा.रा.से. गट-अ कनिष्ठ) या पदासाठी व महाराष्ट्र शासनाच्या  दुग्ध व्यवसाय विकास विभागातील दुग्धशाळा व्यवस्थापक इ. (सा.रा.से. गट-अ) या पदासाठी  अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना दि. ११/०३/२००८ ते १३/०३/२००८ या  दिवशी  प्रत्यक्ष मुलाखतीला बोलावून त्यांची मुलाखत घेतली होती. नेहमीच्या विहित पध्दतीनुसार नियुक्त कमेटीच्या सभासद उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेतांना प्रत्येक उमेदवाराला त्यांच्या कुवतीनुसार गुण दिले जातात, व त्यानुसार कमेटीच्या सर्व सभासदांनी सर्व  उमेदवारांना दिलेले गुण दर्शविणारा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येवून त्यावर कमेटीच्या सर्व सभासदांच्या स्वाक्षऱ्या असतात. या पध्दतीनुसार महाराष्ट्र शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागातील महाव्यवस्थापक,  उपदुग्धशाळा  व्यवस्थापक इ. (सा.रा.से. गट-अ कनिष्ठ) या पदासाठी व दुग्धशाळा व्यवस्थापक इ. (सा.रा.से. गट-ब) या पदासाठी मुलाखत प्रक्रियेत मुलाखत घेणाऱ्या कमेटीने मुलाखत घेतलेल्या उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीत दिलेल्या मूळ गुणपत्रिकेच्या प्रती व तुलनात्मक तक्त्यांच्या प्रती मिळाव्यात.

(Certified copies of individual statements of score given to the candidates by each of the committee member and comparative statement of score of all the candidates).

वरीलप्रमाणे माहिती मागितलेली असून सदर माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केले आहे.

७. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.१०/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. ०२/०६/२०१० रोजी माहिती उ पलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्या माहितीने सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

८. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, आयोगाचे प्रत्येक सदस्य हे जे गुण देतात ते त्यांचा वैयक्तिक अनुभव तसेच उमेदवारांच्या मुलाखातीतील कार्यक्षमता यावर अवलंबून असते. तसेच आयोगाचे सदस्य व तज्ञ हे मुलाखतीकरिता मुलाखतीची कामे स्विकारतात. त्यांनी दिलेले गुण हे प्रकट होणार नाही या विश्वासानेच ते ही कामे स्विकारतात अन्यथा अशा प्रकारच्या मुलाखती ते स्विकारत नाही कारण त्यातूनही आरोप होण्याची शक्यता असते तसे झाल्यास मुलाखतीचे वेळी त्यांना अनेक आरोपास सामोरे जावे लागेल व त्यामुळे योग्य ती कामे ते करु शकणार नाही. त्यामुळे सदस्यांनी वैयक्तिकरित्या दिलेले गुण प्रकट करणे हे योग्य होणार नाही. मात्र प्रत्येक उ मेदवारास सरासरी गुण किती मिळतील हे प्रकट करण्यास काहीच हरकत नसावी, त्यामुळे आयोगाची पारदर्शकता व विश्वासअर्हता हे वाढीस लागेल व त्यामुळे मुलाखतीतील शिफारस झालेले उमेदवार यांची सरासरी गुणांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपील क्र. ९६१/नाग/२०१० हे खारीज करण्यात येते.

२. अपील क्र. ९६२/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना शिफारस केलेले उमेदवारांचे सरासरी गुण व अपीलकर्ता यांचे स्वतःचे मिळालेले सरासरी गुण याची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १००२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नारायण वणीकर<br>वनश्री कॉलनी, डॉ. रुढे यांचे दवाखाण्यासमोर, नवेगांव कॉम्प्लेक्स, गडचिरोली<br>ता.जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती गडचिरोली<br>ता.जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>पंचायत समिती गडचिरोली<br>ता.जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०८/२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी उपस्थित असून खुलासा व कागदपत्रे दाखल केले आहे.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे दि. २१/०४/२०१० च्या पत्रानुसार गौण खनिजाची रॉयल्टी ची रक्कम रुपये ८५,६६४/- चा भरणा केल्याचा डि. डि. क्रमांक, दिनांक व रक्कम भरल्याबाबतची सत्यप्रत घेणार असे म्हटले आहे.

३.	अर्जाच्या अनुषंगाने दि. २८/०६/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती, लेखा विभागाने उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०८/०७/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. त्यामधे दि.२५/०५/२०१० व १७/०६/२०१० च्या सत्यप्रती देण्यात आल्या. परंतू समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही व जे पत्र दिलेले आहे ते विलंबाने दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी श्री ए. बी. चौव्हाण शाखा अभियंता व सहाय्यक आरेखक पंचायत समिती गडचिरोली यांनी पत्राबाबत किंवा प्रायोक्ती बाबत विचारणा केली होती त्याप्रमाणे श्री ए. बी. चौव्हाण शाखा अभियंता यांचा काहीही संबंध नाही व सहाय्यक लेखा अधिकारी यांचे कार्यालयात माहिती उपलब्ध नाही असे कळविले आहे व तेच अपीलकर्ता यांना सुध्दा कळविलेले आहे. याचा अर्थ रॉयल्टी भरण्यात आलेली नाही असा होतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे. परंतू ती माहिती विलंबाने उपलब्ध झाल्याचे कारण त्यांनी असे सांगितले की, श्री ए.बी. चव्हाण, शाखा अभियंता यांना दि.२५/०५/२०१० रोजी पत्र दिले. परंतू त्यांचेकडे मागितलेली माहिती उपलब्ध नाही व याविषयावरील माहिती ही लेखा विभागाशी संबंधित असल्याने पुरविणे शक्य नाही असे शाखा अभियंता यांनी जनमहिती अधिकारी यांना कळविले. परंतू दि.०३/०५/२०१० चा अर्ज असून दि. ०३/०६/२०१० रोजी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते, परंतू मुळातच श्री ए.बी. चौहान शाखा अभियंता यांना दि. २५/०५/२०१० रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. त्यामुळे श्री ए. बी. चौहान शाखा अभियंता पंचायत समिती यांचेकडून विलंबाने उत्तर आले आहे. त्यामुळे ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन न देण्याकरीता जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार असतील

त्यांचे बाबत चौकशी करुन त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. ०३/०५/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्याबाबत जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १००३/नाग/२०१०**

१. श्री मधुकर विठ्ठलराव बोडे - **अपीलकर्ता**
रा. नवेगांव (मुरखळा) मोरेश्वर पेट्रोल पंपाजवळ पो. मुडझा
ता.जि. गडचिरोली - ४४२ ६०५

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक - **उत्तरवादी**
अतिशित रेत प्रयोगशाळा (मोठा हनुमान मंदिर समोर) तेलंगखेडी, नागपूर
ता.जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रक्षेत्र व्यवस्थापक - **उत्तरवादी**
वळूमाता प्रक्षेत्र, वडसा (देसाईगंज)
ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली.

**(आदेश पारित दिनांक १०/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी उपस्थित असून खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्र. १२०५/२००९ मधील दि. १७/०९/२००९ च्या अर्जाच्या माध्यमातून तीच माहिती मागितली होती. व त्या संदर्भातील अपील हे त्रयस्थ पक्षाची माहिती आहे म्हणून खारीज करण्यात आले होते. त्यामुळे सदरचे अपील सुध्दा खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०१३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दुर्वास भिमटे<br>जुना जरीपटका, ख्रिश्चन कब्रस्तान जवळ, नागपूर<br>ता.जि. नागपूर - ४४० ०१४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा<br>ता.जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पुनवर्सन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी उपस्थित असून खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे दि. ०१/०१/१९९५ ते दि. ३१/०३/२०१० पर्यंत गट 'क' व गट 'ड' मध्ये नोंदणी केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे जेष्ठता यादी त्यांचे निवासी पत्त्यासह माहिती उपलब्ध होणेबाबत नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३.	अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दि. २४/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १६/०६/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहिती करिता येणारी रक्कम शासकीय खजिन्यात जमा करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, खर्चाचा भरणा करण्याचे पत्र त्यांना दि. १२/०५/२०१० रोजी पाठविण्यात आले असले तरी त्यांना ते दि. ३१/०५/२०१० रोजी प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध व्हावी याकरीता त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा दि. २३/०४/२०१० चा असला तरी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तो दि.२७/०४/२०१० रोजी प्राप्त झाला आहे. व माहिती अधिकारी यांचेकडे हा अर्ज दि.०४/०५/२०१० ला प्राप्त झाला आहे. त्यानंतर त्यांनी दि. १२/०५/२०१० रोजी शुल्क भरण्याचे पत्र दिले आहे ते मुदतीत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी शुल्क भरल्याची माहिती उपलब्ध करुन घ्यावी हा प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. वास्तविक प्रत्यक्ष जनमाहिती अधिकारी यांनी अर्ज किती तारखेला प्राप्त होतो. ती तारीख हा अर्ज प्राप्त होण्याच्या तारखेस स्विकारणे योग्य आहे. जिल्हाधिकारी कार्यालय हे एक सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात ज्या दिवशी अर्ज प्राप्त होतो त्या दिवसापासून ३० दिवसांची मुदत ही ग्राहय धरावी लागते. त्यामुळे २७/०४/२०१० ते २६/०५/२०१० ही ३० दिवसांची मुदत आहे. त्यामुळे दि. १२/०५/२०१० रोजीचे पत्र हे मुदतीत पाठविण्यात आले आहे. अधिनियमाचे कलम ७ (३) अन्वये अतिरिक्त शुल्क भरण्याचे पत्र पाठविल्यापासून तर अतिरिक्त शुल्क भरण्याचा कालावधी हा ३० दिवसा करीता वगळण्यात येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना जेव्हा पत्र मिळाले तेव्हापासून शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता १० दिवसांचा कालावधी हा जनमाहिती अधिकारी

यांचेकडे उपलब्ध होतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २९/०५/२०१० रोजी किंवा नंतर केव्हाही खर्चाचा भरणा भरणे आवश्यक होते व नंतरच्या १० दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागला असता. त्यामुळे अपीलकर्ता यांनी शिघ्र शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०१४/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अरुण शिवदासजी जयसिंगपूरे<br>महादेव वार्ड मु. पो. आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा -४४२ २०१ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली<br>ता.जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली<br>ता. आलापल्ली जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी उपस्थित असून खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहेत.

अपीलकर्ता यांनी दि. २०/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली जि. गडचिरोली यांचेकडे स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२०/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १५/०५/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे मुद्यांच्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि. ०९/०६/२०१० रोजी रुपये ५०/- भरण्याबाबत कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला आहे त्यानंतर त्यांना दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे सांगितले त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना असे सांगितले की, ज्या कारणास्तव त्यांनी माहिती मागितली होती त्याबाबतची कार्यवाही झालेली आहे त्यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती न करता त्यांची बदली इच्छित स्थळी करण्यात आलेली आहे तसे त्यांना नोंदणीकृत पत्राने पाठविण्यात आले आहे. परंतू अपीलकर्ता यांना ते मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आयोगासमोर त्यांचे बदलीच्या पत्राची प्रत दिली व पोच घेतली त्यामुळे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०३०/नाग/२०१०</u>**

१. श्री रामसागर पुंडलीक पिलेवान - **अपीलकर्ता**
८३, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर
ता. जि. नागपूर -१५

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक - **उत्तरवादी**
भूमि अभिलेख भंडारा
ता.जि. भंडारा

३. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक - **उत्तरवादी**
भूमि अभिलेख पवनी
ता.पवनी जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक १३/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १९/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तालुका निरिक्षक भूमि अभिलेख पवनी, भंडारा येथील दोषी कर्मचारी व अधिकारी (एस. आर. शेख तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, नियामतदार भोयर, व्ही. ए. सरगे दुरुस्ती लिपिक शा. भ. ढाले, तालुका निरिक्षक भूमि अभिलेख रा. ह. महाकाळ, भूमापक आर. सी. शहारे तत्कालीन अधिक्षक, भूमि अभिलेख भंडारा व इतर) यांचेवर कार्यवाही संबंधी अधिक्षक भूमि अभिलेख भंडारा यांचे दि. २८/०७/२००९ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत पुरविण्यात यावी. माहितीचा कालावधी डिसेंबर १९९२ ते आजतागायत असून माहिती व्यक्तीशः तसेच साध्या नोंदणीकृत टपालाने घेणार असे दोन्ही पर्याय दिले आहेत.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १९/०५/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी दि. २०/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ज्या कार्यवाहीच्या अहवालाच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती चौकशीची आहे. त्याकरिता त्यांनी पुन्हा आक्षेप घेणारे पत्र दिले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. १८/०४/२०१० रोजी ता. निरिक्षक भूमि अभिलेख पवनी म्हणजेच माहिती अधिकारी यांनी अहवाल तयार आहे व तो खर्च भरुन उपलब्ध करुन घ्यावा असे पत्र दिलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केला नाही व प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना दि. १९/०५/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे चौकशी करुन निष्कर्ष दिलेला आहे व यावरुन त्यांना कार्यवाहीची माहिती मिळाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत कर्मचाऱ्यांच्या विरुध्द कार्यवाही करावयाची आहे असा चौकशीचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांची गुणवत्तेच्या बाबत तक्रार दिसून येते. अपीलकर्ता हे केंद्र शासनाचे अधिकारी आहेत व त्यांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा लागू आहे त्यांची अनेक अपीले आयोगापुढे सुनावणीसाठी असतात. त्यांना अनेक वेळा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती जशी आहे तशीच उपलब्ध करुन देता येते ही बाब निदर्शनास

आणली आहे व त्याकरीता त्यांचे लक्ष माहिती या संज्ञेच्या व्याखेकडे सुध्दा बऱ्याचवेळा वेधण्यात आले आहे. परंतू प्रत्येक अपीलात त्यांची तक्रार ही संबंधीत प्रकरणात झालेल्या निर्णयाच्या गुणवत्तेच्या बाबत असते व कोणत्याही प्रकरणातील निर्णयप्रक्रियेच्या संदर्भातील राज्य माहिती आयोगास चौकशी करण्याचा अधिकार नाही असेही त्यांना वारंवार सांगितले. परंतू त्यांना माहिती मिळाली तरी ते प्रथम अपील व द्वितीय अपील सादर करुन गुणवत्तेच्या बाबत तक्रार करीत असतात या प्रकरणात सुध्दा त्यांना माहिती जशी आहे तशीच मिळालेली आहे व त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०३४/नाग/२०१०</u>**

१. श्री रमेश पांडुरंग येरपुडे - **अपीलकर्ता**
रुकमिनी ३०१, शाकंबरी सभागृहामागे, सिमेंट नाला रोड, नंदनवन, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
आयुक्त, राज्य कामगार विमा योजना
महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, एस. एस. राव रोड, परेल, मुंबई-४०० ०१२

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
आयुक्त, राज्य कामगार विमा योजना
महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, एस. एस. राव रोड, परेल, मुंबई-४०० ०१२

**(आदेश पारित दिनांक १३/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांचे वतीने वैद्यकीय प्रशासन अधिकारी श्री श्रीखंडे राज्य कामगार विमा योजना यांना प्राधिकृत केले आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (५) अन्वये जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः हजर राहून माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करावयाचे असते व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः हजर रहावे असे नोटीसीतील अनुक्रमांक ६ मध्ये दिलेले आहे तरीसुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी

नागपूर येथील अधिकाऱ्यास प्राधिकृत करुन आयोगासमोर उपस्थित राहण्याचे टाळले आहे. व आयोगाचा अवमान त्यांनी केल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

३. माहितीचा कालावधी १७/०९/२००८ ते ३१/०९/२००९ असून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

अपीलकर्ता यांनी दि. १४/०९/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांचेकडे राज्य कामगार विमा योजना नागपूर येथून दि.३१/१२/२००४ ला सेवानिवृत्ती विलंबाने प्रदान केलेल्या निवृत्ती वेतन व सेवानिवृत्ती उपदान यावर व्याज मंजूर होवून सुध्दा (शा.नि. दि.१७/०९/२००८ प्रत संलग्न) न मिळणेबाबत.

सेवानिवृत्ती नंतर विलंबाने प्रदानाबाबत अ. शा. निर्णय दिनांक १७/०९/२००८ ला आदेश काढून रु.११९८४/- व्याज देण्याचे आदेशामध्ये वित्तविभागाची मंजूरी आवश्यक असतांना ती घेतली नाही ती सद्यस्थिती कळवावी.

अशाप्रकारची माहिती मागितलेली असून माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

४. सदरची माहिती लिफाफा पाठविला आहे व पत्राद्वारे पाठविण्यात यावी असे नमूद केलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचा अर्ज हा दि.१२/१०/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संचालक (प्रशासक) राज्य कामगार विमा योजना यांचेकडे हस्तांतर करण्यात आलेला दिसून येतो. परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०७/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता हे नंतर उपस्थित झाले व त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू त्याकरीता त्यांना दोन वर्षाचा कालावधी लागला. परंतू अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज मुळात दि.१४/०९/२००९ आहे व त्यानंतरच त्यांच्या म्हणण्याचा विचार करण्यात येतो. श्री येरपुडे यांना सेवानिवृत्तीनंतरच्या देयकाच्या रकमेस विलंब झाल्याने त्यांनी त्यावरील व्याजाची मागणी केली.

५. सदर व्याजाच्या रकमेची मागणी दि. १७/०९/२००८ अन्वये शासन स्तरावर मंजूर झाली. त्यानुसार देय रकमेचे देयक कोषागार नागपूर येथे मंजूरीसाठी सादर केले असता व्याजाच्या शासन मंजूरीस वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक असल्याचा आक्षेप घेऊन कोषागार नागपूर यांनी देयक परत केले. त्यामुळे श्री येरपुडे

यांना व्याजाची रक्कम अदा करणे शक्य झाले नाही. त्यांचा माहितीचा अर्ज आल्यानंतर दि.२५/११/२००९ च्या पत्रान्वये शासनास कळविण्यात येवून त्याची पृष्ठांकित प्रत अपीलकर्ता यांना दिली. पुन्हा दि. २८/०१/२०१० रोजी स्मरण पत्र दिले. व पुन्हा या प्रकरणी शासनास स्मरण पत्रे देण्यात आली. त्यानंतर व्याजासाठी शासन मंजूरी प्राप्त झालेली असल्यास पुन्हा वित्त विभागाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे दि. २४/०४/१९९५ चा शासन निर्णय या कार्यालयास उपलब्ध झाल्याने सदर शासन निर्णय कोषागारात सादर करुन व्याजाचे देयक प्रथम प्राधान्याने पारित करुन घेण्यास वैद्यकीय प्रशासन अधिकारी नागपूर यांना आदेशित करण्यात आले आहे. देयक मंजूर झाल्यावर अपीलकर्ता यांना व्याज सुध्दा प्राप्त झाले आहे. सदरच्या प्रकरणी मात्र जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना उत्तर न कळविता शासनाकडे पाठविलेल्या पत्राच्याच प्रती पाठविल्या आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य रितीने दिलेला नाही. त्या बाबतची कार्यपध्दती जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जाणून घेणे आवश्यक आहे. आज जर ते आयोगापुढे उपस्थित राहीले असते तर त्यांना कार्यपध्दती समजली असती परंतू माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०४०/नाग/२०१०</u>**

१. श्री राहूल विश्वनाथ भवसागर - **अपीलकर्ता**
मु. रुपेरा पो. मोहगांव (ख.)
ता. तुमसर जि. भंडारा - ४४१९१५

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक १३/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर असून निवेदन दिले आहे. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने विस्तार अधिकारी पी. व्ही ठवरे हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती तुमसर यांचेकडे संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत सिहोरा ग्राम पंचायत येथील शौचालय बांधकामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन २००७ ते आजतागायत असून त्यावर एकूण ५ मुद्यांवर माहिती साक्षांकित प्रतीत मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे असे नमूद केलेले दिसते.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०५/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०५/०५/२०१० रोजी देण्यात आलेला असून अर्जदारास संपूर्ण माहिती दि. १०/०५/२०१० पर्यंत पुरविण्याबाबत कार्यालयीन पत्र देण्यात आले. जर जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेल्या माहिती नुसार मुद्या क्र. २, ३, ४ व ५ ची माहिती दिली नाही तर संपूर्ण जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांचेवर राहील असा आदेश दिला आहे. त्यानंतरही माहिती पूर्ण उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी २००७ ते २००९ या कालावधीतील माहिती मागितलेली होती. परंतू अपीलकर्ता यांना फक्त २००९ या वर्षातील माहिती उपलब्ध झाली आहे. खंडविकास अधिकारी तथा माहिती अधिकारी पंचायत समिती तुमसर यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे सदरचा अर्ज ग्राम पंचायत सिहोरा यांचेकडे हस्तांतर केला आहे व प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिली आहे. त्याप्रमाणे दि. ०१/०४/२०१० रोजी ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत सिहोरा यांनी माहिती स्वत: येऊन घेवून जावी असे कळविले आहे व त्या प्रमाणे दि. ०१/०४/२०१० रोजीच एकूण ५ मुद्यांवरील माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती ही पंचायत समिती कडे मागितलेली असल्यामुळे ती सिहोरा ग्राम पंचायत विकास अधिकारी यांनी पंचायत समितीकडे पुरवावी व त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आक्षेप लेखी दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि. १३/०४/२०१० रोजी ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत सिहोरा यांनी माहितीची कागदपत्रे ही अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती तुमसर यांना उपलब्ध करुन दिली.

त्यानंतर पुन्हा दि. १९/०४/२०१० रोजी विस्तार अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उर्वरीत माहितीच्या करीता दि. २९/०४/२०१० ला उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. १०/०५/२०१० रोजी विस्तार अधिकारी ग्राम पंचायत समिती तुमसर यांनी २३० सत्यप्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. पुन्हा दि. १४/०५/२०१० रोजी माहिती प्राप्त करुन घ्यावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. परंतू संपूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. २००७ व २००८ या वर्षातील माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, ते फेब्रुवारी २००९ पासून सिहोरा ग्राम पंचायतीत कार्यरत आहेत. व त्यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेतला होता परंतू ती माहिती त्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही. पुन्हा प्रभार घेतांना उपलब्ध करुन दिली किंवा नाही असे विचारता या प्रभागात ती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे कार्यालयात माहिती उपलब्धच नाही असे सांगितले गेले. अपीलकर्ता यांनी ग्रामविकास अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेतांना जो आक्षेप घेतला आहे तो योग्य नाही मुळात माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असते किंवा संबंधीत कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असते त्या कार्यालयातील माहिती अधिकारी यांनाच माहिती मागणे अधिनियमाच्या तरतुदीनुसार योग्य आहे. परंतू ज्या माहिती अधिकाऱ्याकडे माहिती मागितलेली आहे व त्यांच्या कार्यालयातील जर ती माहिती नसेल तरी संबंधीत कार्यालयाकडे हस्तांतर करणे हे अधिनियमाच्या तरतुदीनुसारच आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचा आग्रह हा अनाठायी आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पूर्वीची माहिती उपलब्ध नाही असे जेव्हा सांगितले व त्यावर अपीलकर्ता यांचा जर विश्वास नसेल तर अपीलकर्ता यांनी ग्राम पंचायत कार्यालयातील अभिलेखांची तपासणी करणे संयुक्तिक राहील. त्या तपासणीअंती जर माहिती उपलब्ध झाली तर त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती या उपलब्ध करुन घ्याव्यात. परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे व त्याच्या छायांकित प्रतीचा खर्च अति होत असल्यास व अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना ते विनामुल्य पुरविण्याचे असल्याने ती जास्तीत जास्त १०

पृष्ठांच्यापेक्षा जास्त नाही एवढयाच छायांकित प्रती देणे संयुक्तिक राहील. जेणे करुन ग्रामपंचायत निधीवर बोजा पडणार नाही ग्राम पंचायतीचा निधी हा विकास कामासाठी असतो व त्याकरीता ग्राम पंचायतीची कोणत्याही खर्चास मंजूरी आवश्यक असते. त्याकरीता अपीलकर्ता यांनी अतिरिक्त माहितीची नोंद करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्यादिवशी उपस्थित राहून ग्राम पंचायतीतील संबंध लेख्यांचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व माहिती तशीच उपलब्ध न झाल्यास खंडविकास अधिकारी यांचेकडे (माहितीचे अधिकारात नाही) तक्रार करावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १०३७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दत्तात्रय कृष्णराव पितळे<br>१३. दंडिगे ले आऊट, शंकरनगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - १० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक<br>नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर<br>सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता<br>नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर<br>सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १३/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १२/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नगर रचना विभाग, महानगर पालिका, सिव्हील लाईन्स् नागपूर यांचेकडे खसरा नं. ४/१, प.ह.नं. ०७, मौजा नं. १६३८ टाकळी सीम श्रीमती निर्मलाबाई फुलसुंगे यांच्या मालकी हक्काच्या जागेचा नकाशा व मंजूरी करीता लावलेल्या कागदपत्रांचा संच टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १६/०४/२०१० रोजी श्रीमती निर्मलाबाई फुलसुंगे यांचे भुखंड क्रमांक कोणत्या सोसायटीचे भूखंड आहे ते आणि इमारतीचा परवाना क्रमांक या विभागास कळविण्यास माहिती पुरविता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी दि. ०९/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०५/०७/२०१० रोजी देण्यात आला असून अर्जदाराने स्वतः कनिष्ठ अभियंता यांचेसोबत अभिलेखाचा तपास करुन घ्यावा व त्याप्रमाणे माहिती द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, नगर रचना कार्यालयामध्ये मंजूर नकाशा क्रमांक असल्याशिवाय माहिती उपलब्ध होत नाही. सर्वसाधारण नागरिकांकडे मंजूर नकाशाचा क्रमांक हा असणे शक्य आहे, खसरा नं. मालकाचे नाव आहे, भूखंड क्र. आहे व त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. परंतू अभिलेख ठेवण्याची जी पध्दत आहे तीच मुळात चौकशीची आहे व त्यामुळे त्यांनी स्वतः शोध घेतला परंतू अशाप्रकारे त्यांच्याकडे माहिती उपलब्ध झाली नाही. श्रीमती फुलसुंगे यांचेविरुध्द त्यांनी न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे व त्या याचिकेमध्येच त्यांना सदरची नकाशाची प्रत दाखल करणे आवश्यक होते जर ती मंजूर नकाशाची प्रत मिळाली नाही तर विशिष्ट कार्यक्षमता (Specific Performance) चा दावा हा खारीज होवू शकतो. व त्याचे नुकसान होवू शकते व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध होणे जरुरीचे आहे. असे असले तरी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा मागितलेल्या माहितीचा कसून शोध घेणे संयुक्तिक राहील. व तशी ती माहिती जर उपलब्ध होवू शकली नाही तर अपीलकर्ता यांना नुकसान भरपाई देण्याचा आदेश आयोगास द्यावा लागेल त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी स्वतः, तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा स्वतः अपीलकर्ता यांच्या समक्ष पुन्हा माहितीचा शोध घ्यावा व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही तर आयोगाकडे तशी तक्रार करावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११२२/नाग/२०१०</u>**

१. श्री नारद कचरुजी कोटांगले - **अपीलकर्ता**
ह.मु. श्रीनगर, सेंदुरवाफा आदिवासी जंगल कामगार सोसायटी मागे
ता. साकोली जि. भंडारा - ४४१८०२

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी - **उत्तरवादी**
प्राथमिक आरोग्य केंद्र, गोठणगाव
ता. मोर/ अर्जुनी जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक १६/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांची आढावा बैठक असल्याने त्यांचेतर्फे कक्ष अधिकारी श्री लोहकरे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १०/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगांव तह अर्जुनी /मोर जिल्हा गोंदिया यांचेकडे त्यांचे वेतन निश्चिती च्या संदर्भात व सेवा निवृत्ती नंतर बाकी असलेल्या देयकाच्या रकमे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. ०६/०१/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीवर वैद्यकीय अधिकारी किंवा जनमाहिती अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे दि. १८/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतर पुन्हा

दि.१०/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांचा खुलासा मागविलेला होता व त्या खुलाशामध्ये अनवधानपणे सही करावयाची राहून गेली असा खुलासा केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते असा दि. १७/०३/२०१० रोजी निर्णय दिलेला आहे. परंतू त्याही मुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळाली ती स्वाक्षरी केलेली नव्हती व त्यातही अपूर्ण माहिती त्यांना दिली. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की, माहिती दिली ती बरोबर आहे पंरतू अनवधानाने स्वाक्षरी करण्याचे राहून गेले होते. मात्र प्रथम अपील मेमो मध्ये अपीलकर्ता यांनी ती तक्रार केलेली असल्याने पुन्हा त्यांना तीच माहिती स्वाक्षरी करुन पाठविण्यात आली असून माहिती परिपूर्ण करुन पाठविलेली आहे. विजेचे मिटर हे तिघात होते दोघांनी १/३ (एक तृतींश) रक्कम भरल्याचे पूरावे त्यांचेकडे दिले आहेत. अपीलकर्ता यांची १ /३ (एक तृतींश) रक्कम भरण्यात आलेली नसल्यामुळे ती रक्कम कापून घेण्यात आली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची रक्कम त्यांच्याकडे आहे असा त्यांचेकडे पुरावा आहे व तो पुरावा त्यांचेकडे असल्यावरही ते मान्य करीत नाही परंतू अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली असल्यामुळे व गुणवत्तेच्याबाबत आयोगाकडून कार्यवाही होत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०५०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मिथुन शंकर बावगे<br>मु. पो. शेणगांव<br>ता. जिवती जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>प्रियदर्शनी विद्यालय, शेणगांव<br>ता. जिवती जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रियदर्शनी विद्यालय शेणगांव, ता. जिवती जि. चंद्रपूर यांचेकडे सुरवाती पासून आजपर्यंत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती तसेच इतर ४ मुद्यांवर खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१) सदर शाळेतील शैक्षणिक सत्र २०००-०१ ते आजपर्यंत कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती व स्वाक्षरी बुकाची साक्षांकित प्रत.

२) शाळेत सुरुवातीपासून ते आजपर्यंत कार्यरत कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव व स्थायी पत्ता याबाबत संपूर्ण साक्षांकित माहिती मिळणेबाबत.

३) शैक्षणिक सत्र २००२-२००३ मधील वर्ग आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांच्या हजेरीबुकाची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

४) शैक्षणिक सत्र २००२-०३ मधील आठवी व नववीच्या निकाल पंजीची संपूर्ण झेरॉक्स प्रत मिळणेबाबत. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. ०१/०१/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू मुद्या क्र. १ व २ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे त्यांनी दि. १३/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. २८/०१/२०१० रोजी घेण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी दि. ०२/०३/२०१० च्या अन्वये दोन दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश दिलेला आहे. दि. ०५/०८/२०१० च्या पत्रान्वये सुध्दा अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिला आहे. व त्या आदेशामध्ये माहिती उपलब्ध करुन न दिल्यास शास्तीस पात्र राहाल असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मुद्या क्र. १ व २ ची माहिती उपलब्ध करुन न देण्याचे मुख्य कारण म्हणजेच संस्था सचिव व मुख्याध्यापक यांनी शाळेच्या सुरुवातीपासून जानेवारी २००७ पर्यंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उपस्थिती व स्वाक्षरी बुक चुनाळा येथे त्यांच्या घरी ठेवून अनेक बोगस व उपस्थिती शुन्य तसेच व्यवसायिक प्रशिक्षण करणारे, शाळेत शिक्षण घेणारे, तसेच शाळेत प्रत्यक्ष काम करणाऱ्या दोन शिक्षकांना प्रत्यक्ष राबवून त्या कालावधीत दुसऱ्याच दोन शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या अशाप्रकारे अनेक व सतरा कर्मचारी बोगस व उपस्थिती शुन्य असुन सुध्दा चुनाळा येथील बुकावर त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली. तसेच ग्रामविकास संघर्ष समितीच्या तक्रारीनुसार वैयक्तिक मान्यतेमध्ये सुध्दा चार कर्मचारी बोगस व त्यांचा उपस्थिती शुन्य कालावधी ग्राहय धरुन वैयक्तिक मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे झालेला आर्थिक भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी आवश्यक असलेली माहिती न देण्याबाबत शाळेतील नऊ कर्मचाऱ्यांकडून प्रयत्न

करण्यात येत आहे व त्यामुळेच मुद्या क्र. १ व २ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी संबंधीत कर्मचाऱ्यांचे पत्ते मागितले व ती त्यांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे उपलब्ध करुन देऊ नये असे त्यांनी लेखी दिलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतू उपस्थिती व स्वाक्षरी बुक हे सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती होत नाही. त्यांचे राहण्याचे पत्ते ही जरी त्यांची वैयक्तिक माहिती असली तरी अपीलकर्ता यांनी जो युक्तिवाद केला आहे त्या युक्तिवादाच्या संदर्भामध्ये पत्ते देणे आवश्यक असले तरी जनमाहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार त्यांचा गैरवापर होवू शकतो. या कारणास्तव तुर्त पत्ते देऊ नये परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या दि. ०२/१२/२००९ च्या अर्जातील मुद्या क्र. १ व २ ची माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जनमाहती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध घ्यावी. जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचेविरुध्द तक्रार आल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १०५२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अशोक केशव रामटेके<br>मु. वरवट पो. पद्मापूर<br>ता. जि. चंद्रपूर - ४४२४०४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केले असून प्राधिकार पत्र दिले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दि.२६/०७/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर यांचेकडे मौजा म्हसाळा तुकूम (साझा पद्मापूर) सर्व्हे नंबर ७७ चा अर्जदार (रामभाऊ दहेगांवकर) नोव्हेंबर २००५ ला तक्रार केली. आणि त्यानंतर अशोक रामटेके यांनी ३, ४ वेळी तक्रारी केल्यात. त्या तक्रार अर्जाची झेरॉक्स प्रत व

त्यावर झालेल्या  कार्यवाहीच्या संदर्भात एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोव्हेंबर २००५ पासून ते डिसेंबर २००७ पर्यंत व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. ३०/०५/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यान अपीलकर्ता यांनी दि.०५/०३/२००८ रोजी मौजा वरवट रा.मा.क. १२६६/एन.ए.पी. /३८/१९७८-७९ मध्ये देण्यात आलेल्या सनदीप्रमाणे जुना सर्व्हे नं. १५२/२ आराजी १.१० हे. आर. पैकीचे आराजी ३४० चौ. मीटरची माहिती मिळण्याबाबत अर्ज प्राप्त झालेला असुन सदर प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे व या प्रकरणाचा शोध लागताच माहिती देण्यात येईल असे तहसिलदार चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना कळविले होते. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६/०७/२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर यांनी ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती मिळवून देवून अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या प्रमाणे माहिती मागण्यास गेले असता तहसिलदार हे लिपीकाकडे पाठवतात व एक लिपीक दुसऱ्या लिपीकाकडे पाठवितात  याप्रमाणे एक दुसऱ्यांकडे ते पाठवित असतात व हे सर्व माहिती देऊ असे सांगतात व माहिती देत नाही म्हणून प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करण्यास विलंब झालेला आहे. तरीही अपीलकर्ता यांचे विलंबाने अपील दाखल करणे हे समर्थनीय ठरणार नाही. कारण अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज  जुलै २००८ मध्ये सादर केला  व  त्यानंतर ८ महिन्यांनी  मे २००९ मध्ये प्रथम अपील दाखल केले. नंतर पुन्हा १३ मे २०१० मध्ये द्वितीय अपील दाखल केले असे असले तरी त्यांच्या दिनांक २६/०७/२००८ च्या अर्जाप्रमाणे कोणतीही माहिती  त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, ते एका महिन्यापूर्वीच सदर कार्यालयात बदलून आले आहेत. त्यामुळे माहितीचा शोध घेवून माहिती देण्याचा प्रयत्न ते करतील परंतू तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी असल्यामुळे  त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू शास्ती  लादण्यापूर्वी  त्यांचे  म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक

असल्याने विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना आयोगाचा निर्णय कळवून त्याप्रमाणे खुलासा सादर करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध असल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रु. २५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये या बाबतचा खुलासा आयोगापुढे १० दिवसाचे आत सादर करावा. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना आयोगाचे आदेशाची माहिती द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १०५१/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती मीना तुकाराम मुन<br>श्री मारोती गणपत वाघमारे<br>मु. पो. गडचांदुर, वार्ड क्र.५, बुध्द विहाराचे मागे<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>राजुरा जि. चंद्रपूर<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय कोरपना<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे अव्वल कारकुन श्री शेख अब्दुला हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २८/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय कोरपना जि. चंद्रपूर यांचेकडे श्री तुकाराम राजेश्वर मुन यांचे नावे असलेल्या रॉकेल विक्री परवानाच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी हा २००१ ते २००६ पर्यंतचा असून माहिती व्यक्तीशः घेणार असे

नमूद केलेले दिसून येते. त्यापूर्वी सुध्दा अपीलकर्ता यांनी राजुरा तहसिल कार्यालयामध्ये दि. ३०/११/२००९ रोजी माहिती मागितलेली दिसून येते. परंतू अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १२/०२/२०१० रोजी केरोसीन परवाना क्रमांक ३/९० हे परवाना तहसिल कार्यालय राजुरा येथून निर्गमित करण्यात आले असुन सदर परवान्याला जिवती तालुक्यातील गाव संलग्न करण्यात आले होते. करिता आपण राजुरा / जिवती तहसिल कार्यालयाशी संपर्क साधून केरोसीन परवाना क्रमांक ३/९० ची माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. ०१/०३/२०१० रोजी परवाना वर्ग करण्याचे संदर्भात परवाना धारक दि. २७/०५/२०१० ला मृत्यु पावल्यामुळे व ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी नंतर वारसान वर्ग करण्यास सादर केल्यामुळे परंतू वारसान वर्ग करता येत नाही त्यामुळे आपला अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. उपविभागीय अधिकारी यांना दि. १७/०६/२०१० रोजी श्री मारोती गणपत वाघमारे रा. गडचांदूर केरोसीन किरकोळ परवाना क्र. ३/९० हा तहसिलदार राजुरा यांचेकडून निर्गमित करण्यात आले आहे. सदर परवान्यास राजुरा तालुक्यातील मानोली, जामणी, नोकारी बैलापूर, गोपालपूर, तिनगुडा व इसापूर हे गाव संलग्न करण्यात आले होते. दि. १८/०१/२०१० नुसार तहसिलदार राजुरा यांनी सदर परवाना पत्नीचे नावाने वर्ग करण्याबाबत जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना सादर करण्यात आले आहे, करिता परवाना क्र. ३/९० बाबतची माहिती तहसिलदार राजुरा यांचेकडून प्राप्त करण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता यांनी सदरची माहिती ही तहसिलदार राजुरा यांचेकडून प्राप्त करुन घेणे संयुक्तिक राहील असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११३८/नाग/२०१०</u>**

१. कु. मनिषा हिरामण सोनवाने - **अपीलकर्ता**
तिवारी कॉलोनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर, गोंदिया
ता. जि. गोंदिया

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - **उत्तरवादी**
गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

**(आदेश पारित दिनांक ३०/०८/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे अव्वल कारकुन श्री शेख अब्दुला हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये खुल्या प्रवर्गातून निवड झालेली महिला उमेद्वारांची तसेच विशेष मागास प्रवर्गातून निवड झालेले उमेदवारांची आवेदन पत्रासोबत जोडण्यात आलेले सर्व कागदपत्र, निवड यादी प्रवर्ग निहाय उपलब्ध करुन

देण्यात यावी. गट 'ड' शिपाई भरती दि. ११/०४/२०१० च्या लेखी परिक्षेतील दि. २८/०४/२०१०, दि.२९/०४/२०१० व ३०/०४/२०१० च्या मुलाखाती च्या संदर्भातील माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.२७/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती गोपनीय असल्यामुळे केंद्रीय माहिती आयोग यांचेकडील श्रीमती ट्रिसा दुरीश विरुध्द केरला पोस्टल सर्कल त्रिवेन्द्रम यांनी दि. ०६/०२/२००६ रोजी निर्णय दिलेला आहे. तसेच राज्य माहिती आयोग मुंबई यांनी त्यांचेकडील प्रकरण क्र. २००७/९८३/०२ श्रीमती रत्नमाला डॅकरी नागपूर विरुध्द एम.पी.एस.सी. मुंबई यांचे प्रकरणी दिनांक ०७/०४/२०१० रोजीच्या निर्णयाचा आधार घेऊन माहिती देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०७/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागितलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी फक्त निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे परंतू निर्णय काय आहे व त्या निर्णयाशी सुसंगत असे कारण मिमांसा दिले नाही. त्यामुळे सदरचे संदर्भ हे गैरलागू आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा सुनावणी घेवून त्यांच्याकडे जनमाहिती अधिकारी यांचेकडील संपूर्ण माहिती त्याच दिवशी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना संपूर्ण माहिती घेवून उपस्थित राहण्याचे आदेश देवून अपीलकर्ता यांना विनामुल्य संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. ११४२/नाग/२०१०

१. श्री श्रीराम फकिराजी भोगे - **अपीलकर्ता**
रा. गणेश वार्ड, पवनी
ता. पवनी जि. भंडारा

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता - **उत्तरवादी**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (गोसीखुर्द प्रकल्प)
सिव्हील लाईन्स नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता - **उत्तरवादी**
गोसेखुर्द उजवा कालवा विभाग क्र.१., वाही (पवनी)
ता. पवनी जि. भंडारा

## अपील क्र. ११४३/नाग/२०१०

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
भंडारा
ता. जि. भंडारा

५. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय पवनी
ता. पवनी जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक ३०/०८/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपील क्र. ११४२/नाग/२०१० व अपील क्र. ११४३/नाग/२०१० ही दोनही द्वितीय अपीलं अपीलकर्ता यांनी दि.३०/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने

(under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपील क्र. ११४२/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता गोसीखुर्द उजवा कालवा विभाग हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता विदर्भ पाटबंधारे विभाग गोसीखुर्द प्रकल्प मंडळ नागपूर यांचे तर्फे सहाय्यक अधिक्षक अभियंता श्री वि. भ. पाठक हे हजर आहेत. अपील क्र. ११४३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार पवनी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा हे हजर आहेत.

२. अपील क्र. ११४२/नाग/२०१० - अपीलकर्ता यांनी दि. ३०/०५/२००९ रोजी कार्यकारी अभियंता गोसीखुर्द उजवा कालवा विभाग क्र. १ वाही (पवनी ) यांचे पवनी येथील शेतगट क्र. ५८४ मधील विहीरीवरील विद्युत पंप बंद करण्याबाबत काय कार्यवाही केली अशी दि. १०/१२/२००७ ते दि. १८/०५/२००९ व त्यानंतर आजपर्यंतची माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २३/०६/२००९ रोजी गोसीखुर्द उजवा मुख्य कालवा सेवा पथकाकडील सा. क्र. ११७२८ मी. जवळ मौजा पवनी गट 'ब' ५८४ मधील विहीरीवर असलेल्या पंपाची वीज जोडणी खंडीत करण्याबाबत संबंधीत विद्युत सहाय्यक अभियंता म. रा. वि. वि. कं. मर्या. उपविभाग पवनी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ३४४ दि. १८/०८/२००९ नुसार कळविण्यात आले आहे असे दिसून येते परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २८/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असून नियमान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही. तरीसुध्दा उपविभागाच्या अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. दि. ०९/०८/२०१० रोजी सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे अपील अर्ज खारीज करण्यात आला. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मौजा पवनी येथील शेत गट नं. ५८४ मधील विज पंपाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला नाही व यादव बूधा भोगे याचे विद्युत कनेक्शन चालू आहे. गोसेखुर्द उजवा कालवा वाही (पवनी) यांनी जमिन व विहीर संपादित करुन मोबदला दिला आहे तरीसुध्दा पुरवठा सुरुच आहे त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, विज पुरवठा खंडीत करणे हे विद्युत विभागाचे काम आहे. व तसे त्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे जी माहिती त्यांनी मागितली आहे ती पुरेशी दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे होते की, विद्युत विभागास अर्जाद्वारे कळविण्यात आले मात्र तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली आहे. पूर्वीच त्यांनी तसे कळविले असते तर विद्युत विभागास माहिती मागता आली असती. परंतू माहितीच्या पूर्वीच्या प्रकरणात आयोग हस्तक्षेप करु शकत नाही व त्यामुळे त्यांना तसे का कळविण्यात आले नाही या बद्यल कोणत्याही प्रकारची चौकशी सुध्दा करता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी तसे विद्युत विभागास विचारल्यास त्यांना माहिती मिळू शकेल. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अभिप्राय मागितला असल्यास उत्तर देता येत नाही. परंतू ज्या प्रश्नातून त्या झालेल्या कार्यवाहीची छायांकित प्रत थोडक्यात टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे सुसंगत आहे परंतू सदरच्या प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांची माहितीची प्रत उपलब्ध झाली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५.	अपील क्र. ११४३/नाग/२०१० मधील दि. २३/०४/२०१० च्या अर्जातील मौजा पवनी येथील शेत गट क्र. ५८२ मधील अर्जदाराचे गव्हाचे पिकाची पाहणी, चौकशी बाबत तलाठी अहवाल मिळण्याबाबत आपले पत्र तलाठी २३/०३/२०१० च्या अनुषंगाने चालू वर्षाच्या सन २०१० ची माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

६.	अर्जाच्या अनुषंगाने दि. २०/०५/२०१० रोजी वस्तुस्थिती कळविण्यात आली असुन माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २३/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. ०३/०८/२०१० रोजी उपविभागीय अधिकारी यांनी अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती किंवा मिळालेली माहिती यात विसंगती आहे. अपीलकर्ता यांनी गट क्र. ५८२, आराजी ५.६३ एकर मधील गव्हाचे पिकाची पाहणी, चौकशी करुन तलाठी अहवालाची मागणी केली होती. त्यानंतर तलाठी व मंडल अधिकारी यांनी पाहणी व चौकशी केल्यानंतर गट ने ५८२ ला गट नं. ५६९ ने ओलीत होत आहे व त्या ठिकाणी पाण्याचे पाट (नहर) काढलेला आहे. नवीन गट ५८२ चा जुना गट नं. ५९२/१ होता त्यामुळे ५९२/१ हे गट तलावापासून ओलीत होत आहे असे दर्शविले आहे. व गट नं. ५८२ चे ७/१२ चे उताऱ्यामध्ये कॉलम १६ या पाणी पुरवठा साधनचे कॉलम मध्ये तलाव असे स्पष्ट नोंद आहे याप्रकारची माहिती दिली. तसेच कीटकनाशकांविषयीची सुध्दा माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतू जी माहिती मागितली होती ती माहिती देण्यात आली नाही. अपीलकर्ता यांना गव्हाच्या पीकाचे नुकसान किती आहे ही माहिती हवी असून त्यांना त्याबाबत माहिती न देता दुसरीच माहिती कळविण्यात आली. अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी गव्हाच्या उभ्या पिकाच्या संदर्भामध्ये पंचनामा केलेला नाही. व त्यात कोणताही उल्लेख सुध्दा केलेला नाही तसेच मौका चौकशी सुध्दा केलेली नाही. परंतू दि.२०/०५/२०१० च्या उत्तरांमध्येच मौजा पवनी येथील गट क्र. ५८२ आराजी ३.७५ हे. आर. मधील गव्हाचे पीक लावलेले होते त्यावेळी गव्हाच्या पिकाला पाण्याची गरज होती इ. बाबत अहवाल मागविला होता. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, गव्हाच्या पिकाच्या संदर्भामध्ये मौका चौकशी त्यांना मिळालेली नाही त्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे. परंतू त्याबाबत आपणास आज आयोगास कोणतेही आदेश देता येत नाही. दि. २३/०४/२०१० च्या नंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ११४२/नाग/२०१० व अपील क्र. ११४३/नाग/२०१० ही दोनही अपील खारीज करण्यात येतात.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ११८९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सतीश इस्तारी मेश्राम<br>मु. पो. पिंपळगांव (खांबी)<br>ता. अर्जूनी/ मोर. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जूनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जूनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे कनिष्ठ लिपीक श्री एस. डी. प्रधान हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तालुका कार्यालय अर्जुनी / मोर. यांचेकडे पिंपळगाव येथील सरकारी स्वस्त धान्य दुकानातील माहिती सन २००८ ते २००९ पर्यंतची तसेच या वर्षातील माहे जानेवारी २०१०, फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० असे एकूण १५ महिन्यांचे विक्री, स्टॉक व बिलबुकचे गोषवारा सहीत दस्तऐवजांची प्रतीलीपींची सत्यप्रत मिळणेबाबत माहिती मागितली आहे. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले असून अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहे असेही नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०४/२०१० अन्वये दोन दिवसांचे आत व्यक्तीशः माहिती घेऊन जाण्याचे कळविले होते. परंतू अपीलार्थी हजर राहून माहिती घेवून गेले नाही. परंतू दि. २१/०४/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस दि. २१/०६/२०१० ला कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली असे दिसते. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यामध्ये संपूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही स्वस्तधान्य दुकानदाराकडील माहिती असल्यामुळे दिलीप मार्तंक मेश्राम यास दि. ०८/०७/२०१० रोजी पत्र देवून उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू संपूर्ण कागदपत्रांना छायांकित करण्याचा खर्च हा रु. १५००/- पर्यंत येऊ शकतो. व तेवढा निधी कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे दि. ०४/०८/२०१० रोजी जिल्हाधिकारी यांना निधी उपलब्ध करुन देण्यास पत्र दिले आहे. अशाप्रकारे रु १५००/- चे अनुदान मंजूर झाल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतःमंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून जिल्हाधिकारी यांचेकडून रु. १५००/- चे अनुदान मंजूर झाल्यावर छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ११८७/नाग/२०१०**
**अपील क्र. ११८८/नाग/२०१०**

१. कु. मनिषा हिरामण सोनवाने - **अपीलकर्ती**
तिवारी कॉलोनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर, गोंदिया
ता. जि. गोंदिया - ४४१६०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - **उत्तरवादी**
गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ती यांनी अनुक्रमे अपील क्र. ११८७/नाग/२०१० दि. ०५/०८/२०१० रोजी व अपील क्र. ११८८/नाग/२०१० दि. ३०/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी अनुक्रमे दि. २४/०५/२०१० व १५/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे मुलाखती करीता २५ गुणांची वाटणी कोणत्या प्रकारे करण्यात आली याबाबतचा प्रोफॉर्मा (नमुना) पत्रक तसेच सर्व उमेदवार कोणत्या तारखेला रुजु करण्यात आले त्यांचे रुजू पत्राची छायांकित प्रत मिळणेबाबतची संपूर्ण माहिती तसेच निवड उमेदवारांना देण्यात आलेले रुजू पत्र, पत्रव्यवहाराचा पुरावा, पोचपावती/ पोस्टाचा पुरावा जावक नोंदवहीचे पृष्ठांची छायांकित प्रत मिळणेबाबतची संपूर्ण माहिती जिल्हा कृषी अधिक्षक यांचे कार्यालयात दि. २८/०४/२०१०, दि. २९/०४/२०१० व दि.३०/०४/२०१० ला गट 'ड' शिपाई भरतीच्या मुलाखती ठेवण्यात आल्या त्या संदर्भातील माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसते. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दि.२३/०६/२०१० व दि.१४/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. दोनही अपीलांमध्ये प्रथम अपीलांचा सुध्दा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. आज जनमाहिती अधिकारी हे हजर सुध्दा झाले नाहीत. असे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकणे बंधनकारक असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा असे आदेश काढणे आवश्यक आहे त्याकरीता अपीलकर्ती यांचे अपील क्र. ११८७/नाग/२०१० व ११८८/नाग/२०१० ही दोनही अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ती यांचे अपील क्र. ११८७/नाग/२०१० व अपील क्र. ११८८/नाग/२०१० ही दोनही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या दोनही अर्जातील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ती यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भात विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रु. १०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत आयोगापुढे करावा. खुलासा न केल्यास त्यांचेविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११६१/नाग/२०१०</u>**
**<u>अपील क्र. ११६२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास एम. मासुरकर<br>हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ८ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे द्वितीय अपीलं क्र. ११६१/नाग/२०१० दि. २८/०७/२०१० रोजी व द्वितीय अपील क्र. ११६२/नाग/२०१० दि. ०६/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता उशिरा उपस्थित झाले. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्र. ११६१/नाग/२०१० व अपील क्र. ११६२/नाग/२०१० या दोनही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी दि. ३०/०८/२०१० रोजी माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे. त्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ११६१/नाग/२०१० व अपील क्र. ११६२/नाग/२०१० ही दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ११६०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजमल रतनलालजी दलाल (राठी)<br>जगदिश कुंज, १८ हिवरी ले आऊट, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नियमितीकरण)<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. सारंग नेरकर उपस्थित आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे पुढील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Construction on Plot No. 24-A & 24 in Kh. No. 22, Mouza Hiwari, C.T.S. No. 774 & 773 respectively sheet No. 313, Ward No. 33 (Old), 96 (New). Padole Nagar / Hiwari Nagar Co-Operative Society.

A) Whether Constrcutions on Plot Nos. 24 & 24 -A as above are sanctioned one, if yes, Please provide copy of Sancitoned Map & Building Permit.

B) If construction is not sanctioned, what action initiated / taken for demolition / removal thereof and please provide documents & details thereof.

C) Whether Plot Nos. 24 & 24-A are sanctioned & whether they are regularized, provide documents.

D) Whether at any time, any complaint for prosecution for illegal/ unauthrorised construction if any on Plot Nos. 24 & 24 -A was lodged. If yes, please give details thereof.

E) What is the extent (area) of construction on Plot Nos. 24 & 24-A, respectively.

सदर माहितीचा कालावधी हा २००१ ते २०१० हा असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. २६/०५/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २१/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जातील 'D' या मुद्याची माहिती मिळाली नाही असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १३/०७/२०१० रोजी देण्यात आला असून इमारत अभियंता (पूर्व) तथा सहाय्यक माहिती अधिकारी व विभागीय अधिकारी (पूर्व) तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून संबंधीत धारिकेचे निरिक्षण करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. सारंग नेरकर यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना इतर मुद्यांची माहिती मिळालेली आहे. परंतू 'D' या मुद्याची माहिती मिळालेली नाही. व प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा त्या बाबत काहीही उल्लेख करुन दिलेला नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाला सांगितले की,

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे धारिकेचे निरिक्षण केले व धारिकांच्या निरिक्षणानंतर अपीलकर्ता यांनी FIR ची प्रत व निर्णयाच्या प्रतची मागणी केली होती. सदरच्या FIR ची व निर्णयाची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्याने पोलीस निरिक्षक कोतवाली यांनी अर्जदारास मागितलेली माहिती पुरविण्या बाबत दि. २६/०८/२०१० रोजी पत्राने मागविण्यात आलेली आहे. व ती प्राप्त झाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. सदरचा गुन्हा हा M.R.T.P. कायद्यांतर्गत दि. ०६/१२/२००६ रोजी दाखल करण्यात आला होता व FIR नं. ३३२६/२००६ हा आहे. गुन्ह्याचा फैसला दि. ०७/०३/२००९ रोजी झाला आहे व ही बाब अपीलकर्ता यांनीच जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणली. यावरुन त्यांना या सर्व प्रकरणाची माहिती असून सुध्दा त्यांनी FIR ची व निर्णयाच्या प्रतची मागणी केलेली आहे. परंतू धारिकेत ती उपलब्ध नसल्यामुळेच किंवा FIR च्या संदर्भात धारिका स्वतंत्र असल्यास ती आढळून आली नाही. त्यामुळे पोलीस स्टेशन मधून सदरची प्रत मागवून ती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले आहे व ती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना पुरविण्यात येईल. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस स्टेशन कडून दाखल झालेली FIR ची प्रत व निर्णयाची प्रत उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**
**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११७५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती जयश्री कर्सलजी मस्के (आरोग्य सेविका)<br>उपकेन्द्र कोथूर्णा, प्रा. आ. केन्द्र मोहदुरा<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी<br>पंचायत समिती भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी<br>प्राथमिक आरोग्य केन्द्र, मोहदुरा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ११७६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ५. | जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोनही द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते.

अपील क्र. ११७५/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. ११७६/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे प्रशासकीय अधिकारी श्री एस. पी. तुरकर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ११७५/नाग/२०१० व अपील क्र. ११७६/नाग/२०१० ही दोनही अपीले दि.१२/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केन्द्र मोहदुरा जि. भंडारा यांचे कार्यालयात अर्जदाराने नमूद केल्याप्रमाणे वैद्यकीय रजेच्या पगार बील व कर्तव्य कालावधीचे वेतन केव्हा मिळणार यासंबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०७/०४/२०१० रोजी माहिती पलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १७/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०९/०६/२०१० रोजी देण्यात आला परंतू अपीलकर्ता यांनी स्वाक्षरी करण्यास नकार दिलेला आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, माहिती मिळाली आहे परंतू ती त्यांना अपूर्ण दिली आहे. त्यांना वेतन मिळाले नाही असे सांगितले असता त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा येथे अपीलकर्ती यांना रुजु होण्यास सांगितले असता तसा रुजु अहवाल सादर न करता विनापरवानगी त्या परस्पर निघुन गेल्या अशा प्रकारे ते उपस्थित राहत नाही, विनापरवानगी निघून जातात अहवाल सादर करीत नाही, कागदपत्रे सादर करीत नाही, कार्यालयात असून सुध्दा कार्यालयातील पत्रे घेत नाहीत, त्यामुळेच त्यांचे वेतनाचे धनादेश तयार असुन सुध्दा ते घेत नाही अशी खालीलप्रमाणे माहिती अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक अरोग्य केंद्र मोहदुरा यांनी दिली आहे.

१) **वैद्यकीय कालावधीच्या वेतनाबाबत**

आपण प्रथम दि. २४/०६/२००९ ते दि. २३/०७/२००९ पर्यंत एकूण ३० दिवस वैद्यकीय रजेवर होते. परंतु रजेवर जाण्यापूर्वी आपला वैद्यकीयदृष्ट्या अकार्यक्षम असण्याबाबत प्रमाणपत्र ह्या कार्यालयास सादर केलेले नव्हते. तसेच दि. २४/०७/२००९ ला आपण ह्या कार्यालयात कामावर रुजु होण्याबाबतचे अर्ज देतांना खाजगी डॉक्टरांचे दि. २४/०६/२००९ ते दि. २३/०७/२००९ पर्यंतचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले त्यानंतर दि.२५/०७/२००९ ला १ दिवसाचे किरकोळ रजेचे अर्ज मंजूर न करता अर्ज परस्पर श्री जि. बी. साखरवाडे आ. सहा. यांचे कडे दिला. व त्यानंतर तुम्ही सादर केलेल्या दि. २८/०७/२००९ च्या अर्जानुसार आपण परत वैद्यकीय दृष्ट्या अकार्यक्षम प्रमाणपत्र न जोडता दि. २८/०७/२००९ पासून सेवेत हजर राहू शकत नाही असे कळविले. संबंधीत कालावधीचा खाजगी डॉक्टरकडून दि. २८/०७/२००९ ते दि. २२/१०/२००९ पर्यंतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले संबंधीत कालावधी ८७ दिवसांचा असल्याने व खाजगी डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले असल्याने आपणास दि. २३/१०/२००९ सादर केलेल्या आपल्या अर्जात मा. जिलहा शल्य चिकित्सक किंवा मेडिकल बोर्ड नागपूर यांचेकडून कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र आनावयास सांगितले. त्यानुसार आपण दि.०४/१०/२००९ ला सादर केलेल्या मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रमाणपत्रानुसार दि. ०३/११/२००९ ला कामाकरिता सक्षम असल्याचे कळले. तसेच दि. २३/१०/२००९ ते दि. ०२/११/२००९ पर्यंतचे आपले वैद्यकीय दृष्ट्या कार्यक्षम असल्याचे किंवा अकार्यक्षम असल्याचे कोणतेही प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच सदर कालावधीतील रजेच्या मंजुरीकरिता विहीत प्रपत्रात न.१ मध्ये माहिती ह्या कार्यालयास सादर केलेला नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील कालावधीची वैद्यकीय रजा मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींचे निराकरण झाल्यानंतरच वैद्यकीय रजा मंजूर करण्यात येवून सदर कालावधीच्या वेतन नियमानुसार काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२) **कर्तव्य कालावधीच्या वेतनाबाबत**

आपण मागितलेल्या माहितीनुसार दि. २३/१०/२००९ ते दि. २८/०२/२०१० चे कर्तव्य कालावधीचे वेतन बाबत आपणास माहिती देण्यात येते की, मा. जि. शल्य चिकित्सक यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार आपण दि.०३/११/२००९ ला कार्यक्षम असल्याचे कळले तरी वैद्यकीय दृष्ट्या अकार्यक्षम असतांना आपण दि.२३/१०/२००९ ते दि. ०२/११/२००९ चे वेतन कर्तव्य कालावधी संबोधून वेतन मागणे नियमबाहय वाटते.

तसेच वरील सर्व बाबींचा विचार करता आपणास दि. ०४/११/२००९ ला मा. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद भंडारा येथे रुजु होण्याबाबत मार्गदर्शनाकरीता पाठविले होते. सदर मार्गदर्शनाबाबतचे पत्र आपण दि. १७/११/२००९ ला ह्या कार्यालयास सादर केले. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांच्या पत्रानुसार आपण दि. १६/११/२००९ ला प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा येथे रुजु करण्यात यावे असे कळविले होते. त्यानुसार आपणास रुजु होण्याबाबत सांगितले असता तसा रुजु अहवाल सादर न करता विनापरवानगी परस्पर निघुन गेले. त्यानंतर आपणास वारंवार रुजु अहवाल तोंडी व उपकेंद्र भेटीत सादर करण्याबाबत सांगण्यात आले. परंतू त्याबाबत आपण कोणताही रुजू अहवाल अजुनपर्यंत विहीत नमुन्यात ह्या कार्यालयास सादर केलेला नाही.

संबंधीत कालावधीचा दिनांक १६/११/२००९ ते दि. २८/०२/२०१० ह्या कालावधीतील केलेल्या कामाचा संपूर्ण अहवाल (राष्ट्रीय कार्यक्रम सर्व) तसेच दौरा दैनंदिनी अजुनपर्यंत ह्या कार्यालयास सादर केलेला नाही. ह्याबाबत आपणास दि. ११/०३/२०१० ला अहवाल सादर करण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते तरी सदर कालावधीचा आपण नमूद केलेल्या दिनांकानुसार दि. २३/१०/२००९ ते दि. २८/०२/२०१० ह्या कालावधीतील संपूर्ण अहवाल सादर केल्यानंतर संबंधीत कालावधीचा वेतन काढण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दि. ३०/०८/२०१० अन्वये खालीलप्रमाणे खुलासा दिलेला आहे.

अपीलकर्ता अर्जदार श्रीमती मस्के आरोग्य सेविका उपकेंद्र कोथुर्णा, प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा, जिल्हा भंडारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेल्या द्वितीय अपिल सुनावणी सदंर्भात खालीलप्रमाणे लेखी खुलासा सादर करण्यात येत आहे.

अर्जदार श्रीमती जे. के. मस्के आरोग्य सेविका उपकेंद्र कोथुर्णा, प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा, जिल्हा भंडारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि. १२/०३/२०१० ला कार्यालयीन प्राप्त दि.१७/०३/२०१० (आ. क्र. ५२/२०१०) ला वैद्यकीय रजेचा पगार बिल व कर्तव्य कालावधीचे वेतन केव्हा मिळणार यांची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. त्यानुसार माहिती पुरविण्याकरीता लागणारा

दस्ताऐवजांचा खर्च पुरविण्याबाबत दि. ०३/०४/२०१० जा. क्र. ०६/०९/२०१० ला पत्र देण्यात आले होते. परंतू सदर पत्रात अपीलकर्त्याने त्याच्या कोणत्या दिनांकित पत्राचे संबंधी माहिती देण्यात येत आहे. याचा खुलासा नसल्याचे सांगून मा. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा यांना दि. ०७/०४/२०१० रोजी कार्यालयीन प्राप्त दि. ०९/०४/२०१० (आ. क्र. ७३/२०१० ला लेखी कळविले).